**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२६८**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २८ मे, २०२१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० मे, २०२१ रोजी झालेल्या २६८व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२८/५/२०२१
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रती,**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>१००३/१००४, १० वा मजला,<br>बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,<br>लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),<br>मुंबई — ४०० ०५३ | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

..२/-

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अतिरिक्त महानगर आयुक्त तथा प्रकल्प संचालक, मुं.म.प्र.वि.प्रा.

अतिरिक्त महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा.

सह महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा.

**प्रत अग्रेषित :-**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६८व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १० मे, २०२१ (मंगळवार) |
| वेळ | : | सकाळी १०.३० वाजता |
| स्थळ | : | मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई — ४०० ०३२.<br>दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. सीताराम कुंटे<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. आय.एस.चहल<br>महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| डॉ. संजय मुखर्जी<br>व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको, मुंबई | - | सदस्य |

**निमंत्रित :**

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश पाठक<br>प्रधान सचिव (२),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| डॉ. के.एच.गोविंद राज<br>अतिरिक्त महानगर आयुक्त (२)/<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | | |

डॉ. बी.जी.पवार
सह-महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.राजीव अग्रवाल
संचालक (प्रणाली),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्रमोद अहुजा
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रदिप यादव
प्रमुख, नियोजन विभाग (अ.का.),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.एम.एस. नारकर
मुख्य अभियंता (अ.का.),
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.यतीन साखळकर
मुख्य अभियंता (अ.का.),
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. आर.एम.गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती

बैठकीच्या सुरुवातीस, मा.मुख्य सचिव हे कार्यकारी समितीचे अध्यक्ष म्हणून प्रथमच बैठकीस उपस्थित राहत असल्याचे त्यांचे महानगर आयुक्त यांनी सर्व सदस्यांच्या वतीने स्वागत केले.

तसेच श्री.संजय कुमार, तत्कालीन मुख्य सचिव व कार्यकारी समितीचे अध्यक्ष यांनी बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख करुन त्यांना धन्यवाद दिले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या २६७व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या २६७व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र. ३ : मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या डि.एन.नगर ते मंडाळे या मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाच्या (पॅकेज सीए०४आर मधील उर्वरित कामे) साखळी क्र.३४०३५.८७३ मी. ते ४६८६०.३८४ मी. पर्यंत भागाच्या उन्नत मेट्रो मार्गाचे व दहा (१०) उन्नत मेट्रो स्थानकांचे (मेट्रो स्थानकांचे आर्किटेक्चरल व छताची कामे वगळून) एसीक नगर, प्रेम नगर, इंद्रा नगर, नानावटी हॉस्पीटल, खिरा नगर, सारस्वत नगर, नॅशनल कॉलेज, वांद्रे, आयकर भवन कार्यालय आणि आय.एल.एफ.एस येथे भाग संकल्पन व बांधकाम पध्दतीने (Part-Design and Construction) बांधकाम करणे.**

३.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाचे सादरीकरण करताना असे सांगितले की, मेट्रो मार्ग-२ब डि.एन.नगर—मंडाळे या मेट्रो मार्गाकरीता उन्नत मेट्रो मार्गाचे व ११ उन्नत मेट्रो स्थानकांच्या बांधकामाकरीता (पॅकेज सीए-०४आर) ११ ऑगस्ट, २०१७ मध्ये ई-निविदा (निविदा किंमत रु.९९८.०५ कोटी) मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रियेअंतर्गत मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांची रु.१०८० कोटी (८.२१% जास्त) दराची लघुत्तम निविदा प्राप्त झाली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २५६व्या बैठकीत मान्यता मिळाल्यानंतर मे. सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांना दिनांक ०९ जानेवारी, २०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. परंतू कामाच्या ३० महिन्यांच्या कालावधीतील २४ महिने उलटून गेल्यानंतरही मे. सिम्प्लेक्स

इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी फक्त ५% काम पुर्ण केले. प्रकल्प पुर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, बांधकाम साहित्य व यंत्रसामुग्री उपलब्ध करणे मे. सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांना शक्य झाले नाही. तसेच कामाची प्रगती राखण्यात कंत्राटदार अपयशी ठरल्याने निविदा अटी व शर्तीनुसार कामाचा करारनामा दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी रद्द करण्यात आला. माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात कंत्राटदाराची सुरक्षा बँक हमी (पॅकेज सीए ०४आर साठी रु. १०८.०० कोटी) जप्तीकरण व रोखीकरण केले.

३.२ महानगर आयुक्त यांनी निविदा प्रक्रियेसंबंधी माहिती देताना असे सांगितले की, पॅकेज सी १०१ मेट्रो मार्ग २ब या कामासाठी कंत्राटदार मे. सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी केलेली कामाची किंमत वगळून, उर्वरीत स्थापत्य कामांचे मुल्यांकन तसेच कामाच्या बाबत झालेली वाढ व जानेवारी, २०१८ ते जानेवारी, २०२० या कालावधीसाठी ५% प्रती वर्ष प्रमाणे भाववाढ, तसेच एमएमआरडीए स्थानक वगळून आलेली किंमत आणि मेट्रो मार्गिका ३ व मेट्रो मार्गिका २ब चे आयटीओ स्थानकाचे एकत्रीकरण या सर्व बाबी अंतर्भूत करून रु.१०५८.७१ कोटी किंमतीच्या कामासाठी फेरनिविदा दिनांक १९ फेब्रुवारी, २०२० रोजी मागविण्यात आली.

सदर निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रक्रियेतील एक निविदाकार मे. एल ॲण्ड टि इन्फ्रास्ट्रक्चर यांनी पॅकेज सी १०१ आणि सी १०२ यांच्या चालू असलेल्या निविदा प्रक्रियेवर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली. परंतु, प्राधिकरणाने कोणताही निर्णय न घेतल्याने मा. उच्च न्यायालयाने हे प्रकरण ऐकले आणि सुनावणी स्थगित करुन पुढील सुनावणी दिनांक ०४ ऑगस्ट, २०२० रोजी ठेवली. त्या अनुषंगाने पॅकेज सी १०१ च्या प्राप्त निविदा संदर्भाने पुढील प्रक्रियेच्या शिफारसीसाठी निविदा शिफारस समितीची बैठक दिनांक ०३ ऑगस्ट, २०२० रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत समितीने सी १०१ साठी निविदा प्रक्रिया रद्द करण्याची शिफारस केली. तसेच पॅकेज सी १०१ व्हायाडक्ट पॅकेजमधील व्याप्तीसोबत ऑयकॉनिक पुलाच्या (बीकेसी प्रवेश एन्ट्री, वाकोला नाला या पुलांच्या) (पॅकेज सी १०६) व्याप्तीसह निविदा समाविष्ट करून संयुक्त स्थापत्य कामाचे सुधारीत निविदा पुन्हा आंमत्रित कराव्यात अशी शिफारस निविदा शिफारस समितीने केली. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग २ब च्या उन्नत मेट्रो मार्गिका व १० उन्नत मेट्रो स्थानकांच्या तसेच आयकॉनिक पुलाच्या स्थापत्य कामाकरीता (पॅकेज सी १०१) रु.११६७.७५ कोटी (सर्व करांसहीत) किंमतीच्या कामासाठी फेर ई-निविदा २९ ऑगस्ट, २०२० रोजी ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली.

उपरोक्त कामासाठी खालील निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या.

१. मे. एन.सी.सी. लिमिटेड
२. मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरस् लिमिटेड
३. मे. एल ॲण्ड टि लिमिटेड
४. मे. जे कुमार इंफ्राप्रोजेट्स लिमिटेड

प्राधिकरणाकडे प्राप्त निविदांच्या छाननीसाठी प्राधिकरणाने खालीलप्रमाणे निविदा शिफारस समिती गठीत केली आहे :-

| | | |
|---|---|---|
| (१) अतिरिक्त महानगर आयुक्त तथा प्रकल्प संचालक | : | अध्यक्ष |
| (२) वित्तीय सल्लागार | : | सदस्य |
| (३) संचालक (प्रकल्प), मेट्रो | : | सदस्य |
| (४) संचालक (प्रणाली), मेट्रो | : | सदस्य |
| (५) मुख्य अभियंता (CTI & RC), बृहन्मुंबई महानगरपालिका | : | सदस्य |

३.३ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, ई निविदांच्या पात्रतेची तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे सल्लागार मे. आयका कॉन्सॉरटीयम (AICA Consortium) मार्फत करण्यात आली. सदर छाननीच्या अहवालानुसार चारही निविदाकार पात्र ठरले. तद्नंतर तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा 'क') निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष दिनांक २४ नोव्हेंबर, २०२० रोजी उघडण्यात आले. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपरोक्तप्रमाणे प्राप्त आर्थिक देकाराची (लिफाफा 'क') निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र | निविदाकारांचे नाव | निविदेची रक्कम (रु.) | प्राप्त देकार रक्कम (रु.) | (+/- ) % | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. एन.सी.सी. लि. | ११,६७,७४,७४,२८४/- | १४,२१,३८,५३,१६८/- | +२१.७२% | L३ |
| २. | मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरस् लि. | | १४,३९,५४,४३,२९२/- | +२३.२८% | L४ |
| ३. | मे. एल ॲण्ड टि लि. | | १३,९९,००,००,०००/- | +१९.८०% | L२ |
| ४. | मे. जे कुमार इंफ्राप्रोजेक्टस् लि. | | १३,८९,४८,४५,८०७/- | +१८.९९% | L१ |

३.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्गिका २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार मे. AICA Consortium यांचा आर्थिक छाननी अहवाल समितीस सादर केला. सदर अहवालानुसार मे. जे कुमार इंफ्राप्रोजेक्टस् लि. यांनी नमूद केलेल्या कारणांमुळे विषयांकित कामासाठी १०.७७ %

अधिक दराचा देकार वाजवी ठरेल अशी शिफारस सल्लागाराकडून करण्यात आली. निविदा शिफारस समितीने साधारण सल्लागार मे. AICA Consortium यांनी सादर केलेल्या सुधारित आर्थिक छाननी अहवालात नमूद केल्याप्रमाणे पॅकेज सी १०१ साठी १०.७७% अधिक किंमतीचा देकार वाजवी आहे अशी शिफारस केली व लघुत्तम निविदाकारास वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्याची शिफारस केली. निविदा समितीच्या दिनांक ०५ जानेवारी, २०२१ रोजीच्या बैठकीत समितीने निविदाकारास त्यांचा देकार १०.७७% अधिक पर्यंत कमी करुन देकार सादर करण्याची सुचना केली. तद्नंतर, मे. जे कुमार इंफ्राप्रोजेट्स लि. यांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये १२% अधिक सुधारित देकार सादर केला. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, त्या अनुषंगाने निविदा शिफारस समितीची बैठक दिनांक ०८ मार्च, २०२१ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत समितीने लघुत्तम निविदाकारास देकार सल्लागाराने प्रस्तावित केल्याप्रमाणे व समितीने मान्य केल्याप्रमाणे १०.७७% अधिक पर्यंत कमी करण्यास सांगितले. परंतु लघुत्तम निविदाकार यांनी त्यांचा शक्य असलेला १२% अधिक दराचा योग्य देकार दिला असुन त्यापेक्षा देकार कमी करण्यास असमर्थता दर्शविली.

३.५ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर मेट्रो मार्ग २ब प्रकल्प २००७ पासून नियोजित असून, प्रथमत: भारत सरकारच्या सूचनेनुसार सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (पी.पी. पी.तत्वावर) करण्यासाठी मे. मुंबई मेट्रो ट्रान्सपोर्ट प्रा.लि. (MMTPL) यांचेबरोबर सवलत करारनामा (Concession Agreement) करण्यात आला. परंतु, सदर कामासाठीचे Financial Closure पूर्ण होऊ न शकल्याने सदर करारनामा २०१४ मध्ये संपुष्टात आणण्यात आला. तद्नंतर शासनाच्या सूचनेनुसार मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मे. डी.एम.आर.सी. यांचेकडून तयार करुन घेण्यात आला. सदर प्रकल्प अहवालास शासनाने आक्टोंबर, २०१६ मध्ये मान्यता दिली. त्याप्रमाणे प्रकल्पाची निविदा प्रक्रिया २०१७ मध्ये सुरु करण्यात आली. उपरोक्तप्रमाणे मेट्रो मार्ग २ब प्रकल्पास होत आलेला असाधारण विलंब निदर्शनास येतो. तसेच, निविदा कामाच्या वावातील प्रिकास्ट एलिमेंटसची अरुंद रस्त्यावर वाहतूक व उभारणी, आयकॉनिक पुलाचे जास्त रहदारीच्या जंक्शनवर उभारणी ई. चा निविदा दर हा वास्तविक बाजार दराप्रमाणे नसणे, सद्यस्थितीत लोखंड व सिमेंटच्या दरात मोठया प्रमाणावर होत असलेले चढ-उतार, मेट्रो मार्ग २ब प्रकल्पास होत असलेला विलंब व अपूर्ण कामामुळे जनतेस होणारा त्रास, मेट्रो मार्ग २अ व ७ या प्रकल्पांच्या कार्यक्षम वापरावर होणारा परिणाम (मेट्रो मार्ग २अ, ७ व २ब यांची एकत्रित साखळी व तिन्ही मार्गासाठी प्रस्तावित मंडाळे मेगा डेपो), स्थापत्य कामांच्या विलंबामुळे मेट्रोच्या रोलिंग स्टॉक, सिग्नलिंग व दूरसंचार प्रणाली, स्वयंचलित तिकीट यंत्रणा, विद्युत व

यांत्रिकी कामे इ. कंत्राटावर होणारा परिणाम इ. बाबी विचारात घेऊन निविदाकाराने सादर केलेल्या १२% अधिक दराचा देकार स्विकारण्यास शिफारस केली.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग २ब पॅकेज सी १०१ (डि.एन.नगर, अंधेरी ते एम.टी.एन.एल, बी.के.सी) उन्नत मेट्रो मार्गाच्या बांधकामासाठी मे.जे कुमार इंफ्राप्रोजेक्टस् लि. यांनी सादर केलेला अधिक १२.००% दराचा रु.१३०७.८८ कोटी किंमतीचा (वस्तू व सेवा करासहित) सुधारित लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटी प्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४ :** **मेट्रो मार्ग-९ (दहिसर (पूर्व) ते मीरा भाईंदर व अंधेरी (पूर्व) ते सी.एस.आय.ए.) तसेच मेट्रो मार्ग-५च्या ठाणे ते भिवंडी भागाच्या प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची (General Consultant) नेमणूक करणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग ९ व ७ अ यांस प्राधिकरणाच्या दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या १४२व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत अंदाजित केलेल्या रु.६६०७ कोटी मूळ किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मेट्रो मार्ग ५ साठी अंदाजीत केलेल्या रु.८४१६.५१ कोटी (सन २०१६ च्या भाव पातळीनुसार) मूळ किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या १४१व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

४.२ अति.महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग-९ (दहिसर (पूर्व) ते मीरा भाईंदर व अंधेरी (पूर्व) ते सी.एस.एम.आय.ए.) तसेच मेट्रो मार्ग ५ च्या ठाणे ते भिवंडी प्रणाली या कामाचा भाग एमएमआरडीए राबवित आहे. प्रणाली भागात मुख्यत्वे रोलिंग स्टॉक, संकेत व दूरसंचार, वीजपुरवठा व ट्रॅक्शन, ई अँड एम, स्टेशन्स व डेपो, एएफसी, पीएसडी, लिफ्ट आणि एस्केलेटर इत्यादी यांचा समावेश आहे. एमएमआरडीएने क्यूसीबीएस (Quality and Cost Based Selection (QCBS) तत्त्वावर मेट्रोच्या कामाच्या अनुभवावर आधारित प्रणाली कामांसाठी साधारण सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. निविदेतील कामाची व्याप्ती खालील प्रमाणे आहे :-

- नमूद मेट्रो मार्गांच्या प्रणाली कामांची दैनंदिन देखरेख करणे.
- नमूद मेट्रो मार्गांच्या निविदा कागदपत्रे, आराखडा तयार करणे आणि प्रणाली निविदांचे मुल्यमापन करण्याकरिता सर्व आवश्यक सहाय्य प्रदान करणे.
- नमूद मेट्रो मार्गांच्या डेपोच्या प्रणाली कामांची दैनंदिन देखरेख करणे.
- नमूद मेट्रो मार्गांच्या कामांची चाचणी आणि प्रणाली सुरु करणे.

४.३ मेट्रो मार्ग - ९ (दहिसर (पूर्व) ते मीरा भाईंदर व अंधेरी (पूर्व) ते सी.एस.आय.ए.) तसेच मेट्रो मार्ग ५ च्या (ठाणे ते भिवंडी) प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता ई-निविदा मागविण्यासाठी दैनिक सामना तसेच मिड-डे वृत्तपत्रात दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पद्धतीनुसार निविदा पूर्व बैठक घेऊन उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले. दिनांक १७ जून, २०२० रोजी दुपारी १५.०० वाजता लिफाफा अ (निविदा किंमत) व दिनांक १५ जुलै, २०२० रोजी दुपारी १५.०० ब (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले. ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | Consortium of M/s. AYESA Ingenieriay Arquitectura S.A.U, Spain & ITALFER S.p.A |
| २ | Consortium of DB Engineering & Consulting GmbH & DB Engineering & Consulting India Pvt.Ltd. |
| ३ | Consortium of Egis Rail S.A.AECOM India Pvt.Ltd. & EGIS India consulting Engineers Pvt.Ltd. |
| ४ | Consortium of MM S.p.A, RITES Ltd. Hill International Inc & SMEC International Pvt.Ltd. |
| ५ | Consortium of Systra MVA Consulting (India) Pvt.Ltd. & SYSTRA France |

४.४ निविदेतील निकषांनुसार सल्लागारांच्या पुढील बाबींचे तांत्रिक मूल्यांकन केले:-

१) मेट्रो प्रकल्पाचा विशिष्ट अनुभव - किमान तीन प्रकल्पांचा अनुभव आवश्यक.

२) सल्लागाराची प्रस्तावित कार्यपद्धती व नियोजन, दावे व्यवस्थापन व प्रशिक्षण योजना.

३) सल्लागाराच्या तज्ञांचा मेट्रो विषयक अनुभव, पात्रता व क्षमता

४) आंतरराष्ट्रीय तज्ञांची उपलब्धता

तांत्रिक छाननी अहवालानुसार पात्र निविदाकारांच्या प्राप्त गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (७५००) |
|---|---|---|
| १ | M/s.AYESA Ingenieriay Arquitectura S.A.U. आणि समुह/संयुक्त उपक्रम | ७०१३.२५ |
| २ | M/s.DB Engineering & Consultig GmbH आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६४९७.२५ |
| ३ | M/s. Egis Rail S.A. आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६५६६.२५ |
| ४ | M/s. MM आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६३९८.२५ |
| ५ | M/s. SYSTRA आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६६५५.५० |

दिनांक ०६ जानेवारी,२०२१ रोजी निविदा शिफारस समितीने, तांत्रिक मूल्यमापन छाननी अहवालाची शिफारस केली. त्यानुसार पाच पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी उघडण्यात आले. प्राप्त वित्तीय सर्व निविदाकारांची प्रस्तावातील किंमत ही भारतीय चलनातच देण्यात आली आहे. त्याचा रुपयात तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | Consortium of M/s. AYESA Ingenieriay Arquitectura S.A.U, Spain & ITALFER S.p.A | १०९,४३,०५,५११/- |
| 2 | Consortium of M/s DB Engineering & Consulting GmbH & DB Engineering & Consulting India Pvt. Ltd. | १०९,४३,०५,५११/- |
| 3 | Consortium of M/s Egis Rail S.A, AECOM India PVT LTD & EGIS India consulting Engineers Pvt. Ltd. | १०१,५३,६०,३००/- |
| 4 | Consortium of M/s MM SPA, RITES Ltd. Hill International Inc & SMEC International Pvt. Ltd. | ९४,३२,००,०००/- |
| 5 | Consortium of M/s SYSTRA MVA Consulting (India)& SYSTRA France | ९०,७६,६८,३२०/- |

..१०/-

सदर निविदेत तांत्रिक गुणांना ७५% भार आणि आर्थिक देकार २५% भार देण्यात आले. त्यानुसार निविदाकारांचे संयुक्त गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | तांत्रिक गुण (७५००) | आर्थिक गुण (२५००) | संयुक्त गुण (१००००) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | M/s. SYSTRA आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६६५५.५० | २५००.०० | ९१५५.५० | १ |
| २ | M/s. AYESA Ingenieriay Arquitectura S.A.U, Spain आणि समुह/संयुक्त उपक्रम | ७०१३.२५ | २११०.८५ | ९१२४.१० | २ |
| ३ | M/s. MM आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६३९८.२५ | २४०५.८२ | ८८०४.०७ | ३ |
| ४ | M/s. Egis Rail S.A. आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६५६६.२५ | २२३४.८४ | ८८०१.०९ | ४ |
| ५ | M/s. DB Engineering & Consulting GmbH आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६४९७.२५ | २०७३.६२ | ८५७०.८७ | ५ |

४.५ दिनांक ०५ मार्च, २०२१ रोजी निविदा शिफारस समितीने निविदेतील अटीं व शर्ती नुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या निविदाकारांच्या प्रस्तावाची म्हणजे Consortium of SYSTRA MVA Consulting (India) & SYSTRA France यांची शिफारस केली. सदर निविदाकाराचा आर्थिक देकार रु.९०,७६,६८,३२०/- (रुपये नव्वद कोटी शहात्तर लाख अडुसष्ठ हजार तीनशे वीस मात्र) (वस्तू व सेवाकर वगळून) अंदाजित निविदा किंमतीपेक्षा (-) २९.४४% कमीचा वाजवी व रास्त आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे Consortium of SYSTRA MVA Consulting (India) & SYSTRA यांचा रु.९०,७६,६८,३२०/- (वस्तू व सेवाकर वगळून) एवढ्या किंमतीचा वाजवी व रास्त देकार स्विकारण्यास व साधारण सल्लागार (GC) म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करारनाम्यातील होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ५ : <u>मेट्रो मार्ग-१० (गायमुख-शिवाजी चौक (मिरा रोड) आणि मेट्रो मार्ग-१२ कल्याण-तळोजा) च्या स्थापत्य कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची (General Consultant) नेमणूक करणेबाबत.</u>**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग - १० (गायमुख-शिवाजी चौक (मिरा रोड) ९.२०९ कि. मी. लांबीचा असुन यात एकूण ४ मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. सदर मेट्रो मार्गाला प्राधिकरणाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या १४६व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या बैठकीत अंदाजित केलेल्या रु.४,४७६ कोटी प्रकल्प पूर्णत्वाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर मेट्रो मार्ग-१० हा मेट्रो मार्ग-४ व ४-अ चा उत्तरेकडील विस्तार असुन सदर प्रकल्पामुळे मुंबई, बोरीवली, मीरा, भाईंदर, घोडबंदर रोड व ठाणे या परिसरातील नागरीकांना मोठा फायदा होणार आहे.

त्याचप्रमाणे, मेट्रो मार्ग-१२ (कल्याण - तळोजा) २०.७५६ कि. मी. लांबीचा असून यात एकूण १७ मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. सदर मेट्रो मार्गासाठी अंदाजित केलेल्या रु.५,८६५ कोटी प्रकल्प पूर्णत्वाच्या खर्चास प्राधिकरणाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या १४६व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर मेट्रो मार्ग-१२ हा मेट्रो मार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) चा विस्तार असून सदर प्रकल्पामुळे कल्याण, डोंबिवली व नवी मुंबई या परिसरातील नागरीकांना मोठा फायदा होणार आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वरील दोन्ही प्रकल्पांच्या स्थापत्य कामांकरिता एकच साधारण सल्लागाराच्या नेमणुकीसाठी अंदाजपत्रके व मसुदा निविदा प्राधिकरणाच्या मेट्रो विभागामार्फत तयार करण्यात आली आहे. मसुदा निविदेमध्ये नमुद केल्यानुसार साधारण सल्लागाराची कामाची व्याप्ती खालील प्रमाणे आहे :-

१) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळामार्फत तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाची आवश्यकता भासल्यास पुनरावलोकन करणे.

२) स्थापत्य कामांचे कंत्राटदार निवडीकरिता आवश्यक असलेले विविध निविदा दस्तावेज तयार करणे आणि सदर प्रकल्पांच्या कामांच्या निविदा प्रक्रिया व्यवस्थापनात सहाय्यता करणे, उदा. आर्किटेक्चर वर्क्स आणि पीईबी, कार-शेड डेपो/स्टॅबलिंग यार्ड इत्यादी.

३) बहुपक्षीय निधी पुरविणाऱ्या संस्थांच्या मार्गदर्शक तत्वे/निर्देशांनुसार गुणवत्ता व सुरक्षा आणि पर्यावरणीय बाबी सुनिश्चित करण्यासह कामांचे परिक्षण करणे.

४) कंत्राटदारांनी केलेली कामे प्रमाणित करणे आणि देयके देण्याची शिफारस करणे.

५) सर्व कंत्राटदार, इतर सल्लागार आणि पुरवठादारांशी समन्वय साधणे.

६) मेट्रो प्रणालीमध्ये इंटरफेस व्यवस्थापनासाठी आराखडा बनविणे तसेच वाहतुकीच्या इतर पद्धतींसह योजनांचे एकत्रीकरण राबविण्यात मदत करणे.

७) मेट्रो मार्ग-१० आणि मेट्रो मार्ग-१२ सुरु करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या मिळविण्यासाठी मदत करणे.

८) बहुपक्षीय / द्विपक्षीय निधी संस्थांच्या मार्गदर्शक तत्वांशी / सुरक्षा धोरणाचे पालन करण्यासंबंधित सहाय्य करणे.

९) आवश्यकतेनुसार स्थळ पाहणी, छायाचित्रण, व्हिडिओग्राफी, वाहतूक सर्वेक्षण, भौगोलिक-तांत्रिक तपासणी आणि इतर संबंधित कामांचे सर्वेक्षण करणे.

महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्रस्तावित साधारण सल्लागार (General Consultancy) अंतर्गत महत्वाच्या तांत्रिक पदांसाठी आंतरराष्ट्रीय तज्ञांचा समावेश असणे निविदेतील अटीनुसार आवश्यक आहे, यास्तव आर्थिक प्रस्ताव भारतीय चलन (रुपये) व विदेशी चलन (युरो/डॉलर/येन) या चलनांमध्ये मागविण्यात आले आहेत.

**५.३ साधारण सल्लागार निविदा प्रक्रिया:-**

१. वरील मेट्रो मार्गांच्या स्थापत्य कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता ई-निविदा मागविण्यासाठी वृत्तपत्रात दिनांक ६ जुलै, २०२० रोजी सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक दिनांक २१ जुलै, २०२० रोजी घेऊन उपस्थित केलेल्या बाबींचे/शंकांचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० होती.

..१३/-

२. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी ५ (पाच) ई-निविदा प्रस्ताव प्राप्त झाल्या. दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता लिफाफा 'अ' (निविदा किंमत) व लिफाफा 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले आहेत :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १. | मेसर्स आयसा इंजेनेरियावाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू, स्पेन, मेसर्स कोरिया नॅशनल रेल्वे आणि मेसर्स एमिअंड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड यांचा समूह. |
| २. | मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम. |
| ३. | मेसर्स डीबी इंजिनीअरिंग व कन्सल्टिंग जीएमबीएच आणि मेसर्स लुईस बर्गर कन्सल्टिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचे यांचा समूह. |
| ४. | मेसर्स सिस्ट्रा, मेसर्स इजिस रेल, मेसर्स इजिस इंडिया व सीईजी यांचा समूह. |
| ५. | मेसर्स एमएमएसपीए, मेसर्स राईट्स आणि मेसर्स एसएमईसी यांचे संयुक्त उपक्रम. |

## ५.४ निविदा शिफारस समिती व तांत्रिक मूल्यमापन समिती स्थापना:

१. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, निविदांचे मुल्यमापन तपासून पुढे शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे निविदा शिफारस समिती (Tender Recommendation Committee) गठीत केली आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त महानगर आयुक्त तथा प्रकल्प संचालक, | अध्यक्ष |
| २ | संचालक (कामे), मेट्रो | सदस्य |
| ३ | संचालक (प्रणाली), मेट्रो | सदस्य |
| ४ | वित्तीय सल्लागार | सदस्य |
| ५ | प्रमुख, नियोजन विभाग | सदस्य |
| ६ | मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, (नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र) | सदस्य |

२. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, निविदांचे तांत्रिक मूल्यमापन करण्याकरीता तांत्रिक मुल्यमापन समिती (Technical Evaluation Committee) गठीत केली असून यामध्ये १) मुख्य अभियंता यांचे विशेष कार्य अधिकारी, २) अधिक्षक अभियंता, मेट्रो, ३) सहाय्यक मुख्य लेखा अधिकारी यांचा समावेश होता.

**५.५ निविदांची छाननी:**

१. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, तांत्रिक मुल्यमापन समितीने (Technical Evaluation Committee) निविदेतील निकषांनुसार निविदाकारांनी सादर केलेल्या तांत्रिक प्रस्तावाचे तांत्रिक मूल्यांकन खालील मुद्यांवर केले :-

१) मेट्रो प्रकल्पांचा अनुभव - किमान चार प्रकल्पांचा अनुभव आवश्यक,
२) साधारण सल्लागाराची प्रस्तावित कार्यपद्धती व नियोजन, दावे व्यवस्थापन आणि प्रशिक्षण योजना,
३) साधारण सल्लागाराच्या तज्ञांचा मेट्रो विषयक अनुभव, पात्रता व क्षमता, आणि
४) आंतरराष्ट्रीय तज्ञांची उपलब्धता

५.६ तांत्रिक मूल्यमापन समितीने तांत्रिक मूल्यमापन अहवाल प्राधिकरणाच्या निविदा शिफारस समितीस दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी सादर केला.

५.७. निविदा शिफारस समितीने (Tender Recommendation Committee) दिलेल्या निर्देशांनुसार निविदाकारांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२० व दिनांक १८ डिसेंबर, २०२० रोजी तांत्रिक प्रस्तावातील निकष-II म्हणजेच सल्लागारांची प्रस्तावित कार्यपद्धती व नियोजन, कामे व्यवस्थापन आणि प्रशिक्षण योजना याबाबतीत सादरीकरण केले. त्यानंतर निविदा शिफारस समितीची बैठक दिनांक १७ डिसेंबर, २०२० व दिनांक १८ डिसेंबर, २०२० रोजी संपन्न झाली. निविदाकारांच्या सादरीकरणानंतर तांत्रिक प्रस्तावांचे अंतिम मुल्यांकन करण्यात आले. निविदा शिफारस समितीने तांत्रिक प्रस्तावातील सर्व मुद्दयांचा तसेच तांत्रिक प्रस्तावातील अंतिम गुणांचा परामर्श घेतला. तांत्रिक प्रस्तावानुसार अहवालातील एकूण ७५०० गुणांपैकी निविदाकारांच्या प्राप्त अंतिम गुणांचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (७५००) | प्राप्त गुण (%) |
|---|---|---|---|
| १. | मेसर्स आयसा इंजेनेरियावाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू, स्पेन, मेसर्स कोरिया नॅशनल रेल्वे आणि मेसर्स एमिअंड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड यांचा समूह (१/५). | ६८४५.२२ | ९१.२६९% |
| २. | मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम (२/५). | ७१७७.३४ | ९५.६९७% |
| ३. | मेसर्स डीबी इंजिनीअरिंग व कन्सल्टिंग जीएमबीएच आणि मेसर्स लुईस बर्गर कन्सल्टिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचे यांचा समूह (३/५). | ६०४६.६६ | ८०.६२२% |
| ४. | मेसर्स सिस्ट्रा, मेसर्स इजिस रेल, मेसर्स इजिस इंडिया व सीईजी यांचा समूह (४/५). | ६९९१.६२ | ९३.२२१% |
| ५. | मेसर्स एमएमएसपीए, मेसर्स राईट्स आणि मेसर्स एसएमईसी यांचे संयुक्त उपक्रम (५/५). | ६२९९.७६ | ८३.९९६% |

..१५/-

५.८ निविदा प्रस्तावात नमूद खंड १, कलम क्र. २०.१.२ अन्वये ज्या निविदाकारांच्या तांत्रिक प्रस्तावाला ८० % अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. तांत्रिक निकषांनुसार पाचही निविदाकारांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असून पाचही निविदाकार तांत्रिकदृष्टया निविदेतील अटींप्रमाणे आर्थिक प्रस्ताव उघडण्यास पात्र होते. निविदा शिफारस समितीने, प्राधिकरणाच्या तांत्रिक मूल्यमापन समितीच्या अहवालानुसार पाच पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) उघडण्याची शिफारस केली.

५.९ महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने पाच पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक २४ डिसेंबर, २०२० रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले.

५.१० प्राप्त वित्तीय प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी निविदेतील अटी प्रमाणे, अंतिम निविदा सादर करण्याच्या तारखेच्या २८ दिवस आधीचा म्हणजेच दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजीचा विनिमय दर (१ USD = रु. ७४.४५ आणि १ EURO = रु. ८८.०४) घेऊन प्राप्त आर्थिक प्रस्तावांचे एकूण रुपयांत रुपांतर करण्यात आले आहे त्यानुसार वित्तीय प्रस्तावांचा (वस्तू व सेवाकर वगळता) तपशील खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | रुपये घटक | युरो घटक | डॉलर घटक | एकूण (निविदा कलमानुसार योग्य विनिमय दराप्रमाणे परिशिष्ट 'अ'नुसार एकूण रुपयामध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | मेसर्स आयसा इंजेनेरियावाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू, स्पेन, मेसर्स कोरिया नॅशनल रेल्वे आणि मेसर्स एमिअंड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड यांचा समूह (१/५). | १६२,१७,१८,९८० | १२,८५,४६४ | १९,८२,७२५ | १८८,२५,०५,१०६.८१ |
| २. | मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम(२/५). | १५५,०४,७७,४५० | - | ३०,१२,६०० | १७७,४७,६५,५२०.०० |
| ३. | मेसर्स डीबी इंजिनीअरिंग व कन्सल्टिंग जीएमबीएच आणि मेसर्स लुईस बर्गर कन्सल्टिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचे यांचा समूह (३/५). | १६७,००,०२,१४७ | १७,२२,३८० | २६,६६,८८० | २०२,०१,८९,६९८.२० |
| ४. | मेसर्स सिस्ट्रा, मेसर्स इजिस रेल, मेसर्स इजिस इंडिया व सीईजी यांचा समूह (४/५). | १९१,९२,४५,००० | - | ४२,०६,००० | २२३,२३,८१,७००.०० |

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | रुपये घटक | युरो घटक | डॉलर घटक | एकूण (निविदा कलमानुसार योग्य विनिमय दराप्रमाणे परिशिष्ट 'अ'नुसार एकूण रुपयामध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| ५. | मेसर्स एमएमएसपीए, मेसर्स राईट्स आणि मेसर्स एसएमईसी यांचे संयुक्त उपक्रम (५/५). | १६६,८५,९४,००० | - | २९,३३,८७५ | १८८,७०,२०,९९३.७५ |

५.११ निविदा प्रस्तावातील कलमांनुसार तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव एकत्रित करताना तांत्रिक निकषाला ७५% भार आणि आर्थिक निकषाला २५% भार देण्यात आला आहे. त्याप्रमाणे प्राप्त एकत्रित गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ.क्र | निविदाकारांचे नाव | तांत्रिक गुण (७५००) | आर्थिक गुण (२५००) | एकत्रित गुण (१००००) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मेसर्स आयसा इंजेनेरियावाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू. स्पेन, मेसर्स कोरिया नॅशनल रेल्वे आणि मेसर्स एमिअंड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड यांचा समूह (१/५). | ६८४५.२२ | २३५६.९२ | ९२०२.१४ | २ |
| २. | मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम(२/५). | ७१७७.३४ | २५००.०० | ९६७७.३४ | १ |
| ३. | मेसर्स डीबी इंजिनीअरिंग व कन्सल्टिंग जीएमबीएच आणि मेसर्स लुईस बर्गर कन्सल्टिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचे यांचा समूह (३/५). | ६०४६.६६ | २१९६.२९ | ८२४२.९५ | ५ |
| ४. | मेसर्स सिस्ट्रा, मेसर्स इजिस रेल, मेसर्स इजिस इंडिया व सीईजी यांचा समूह (४/५). | ६९९१.६२ | १९८७.५२ | ८९७९.१४ | ३ |
| ५. | मेसर्स एमएमएसपीए, मेसर्स राईट्स आणि मेसर्स एसएमईसी यांचे संयुक्त उपक्रम (५/५). | ६२९९.७६ | २३५१.२८ | ८६५१.०४ | ४ |

५.१२ निविदेतील अटींनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल एकत्रित गुण संपादन करणाऱ्या निविदाकाराचा प्रस्ताव देकाराकरिता ग्राह्य धरण्याची तरतूद आहे. त्यानुसार मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम यांना कमाल एकत्रित गुण मिळाले असून त्यांनी रु.१६५,५३,६३,०५०/- + USD ३०,१२,६०० (एकूण रु १८७,९६,५१,१२०/-) एवढया किंमतीचा देकार सादर केला आहे; जो मेट्रो मार्ग-१० व मेट्रो मार्ग-१२ ची अंदाजित निविदा

किंमत रु.२२४.२४ कोटी या किंमतीच्या १६.१८% एवढा कमी आहे आणि मेट्रो मार्ग-१० व १२ प्रकल्प पुर्णत्वाच्या किंमतीच्या (रु.४,४७६ + रु.५,८६५ = रु.१०३४१ कोटी च्या) सुमारे १.८२% आहे.

५.१३ मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा.लि. ही अनुभवी व विख्यात सल्लागार कंपनी असून त्यांनी अन्य देशातील मेट्रो प्रकल्पांकरिता साधारण सल्लागार म्हणून सेवा पुरविली आहे. सदर सल्लागार कंपनी यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाची सेवा खालील मेट्रो प्रकल्पाकरिता यशस्वीरित्या पुरविली आहे :-

- गुजरात मेट्रो
- कोलकत्ता मेट्रो
- हैद्राबाद मेट्रो
- नागपुर मेट्रो

तसेच प्राधिकरणाच्या मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (MTHL) प्रकल्पाकरिता M/s. AECOM Asia Company Ltd., PADECO Co. Ltd., Dar AI-Handasah Consultants, TY Lin International समुह/संयुक्त उपक्रम हे साधारण सल्लागार म्हणून कार्यरत आहेत व त्यांचे काम समाधानकारक आहे.

५.१४ सदरचा निविदाकार, निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा वाजवी व रास्त असून तांत्रिक मूल्यमापन समितीने दिनांक २८ डिसेंबर, २०२० रोजी अंतिम अहवाल पुढील मान्यतेसाठी निविदा शिफारस समितीस सादर केला.

५.१५ तांत्रिक मूल्यमापन समितीने सादर केलेल्या अंतिम अहवालास निविदा शिफारस समितीने त्यांच्या दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली. त्या अनुषंगाने निविदा स्विकारण्यास शिफारस केली.

५.१६ संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषानुसार कमाल एकत्रित गुण संपादित केलेले मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम यांचा प्रस्ताव वाजवी व रास्तअसून त्यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

५.१७ वित्त विभाग, भारत सरकारच्या कार्यालयीन आदेश क्र. OM.- F.६ ६/१८/२०१९- PPD, दिनांक २३ जुलै, २०२० मध्ये नमुद केल्याप्रमाणे मे. एकॉम एशिया कंपनी लिमिटेड यांचे कार्यालय हाँगकाँग इथे असल्यामुळे त्यांना सक्षम प्राधिकरणाकडून नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे.

..१८/-

त्यांना सदर प्रमाणपत्राबद्दल ई-मेल द्वारा विचारणा केली असता त्यांनी कळविले की, अलीकडे, इतर शासकीय संस्थांनी मे. एकॉम यांना स्विकृतीपत्र दिले असून त्यामध्ये मे. एकॉम एशिया प्रा. लि. हे भागीदार आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

१) महा-मेट्रो यांनी साधारण सल्लागार म्हणून दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजी स्विकृतीपत्र दिले आहे.
२) मे.नॅशनल हायवे ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशन लि. यांनी सल्लागार म्हणून दिनांक २८ डिसेंबर, २०२० रोजी स्विकृती पत्र दिले.

आहे. सदर स्विकृती पत्रांविषयी संबंधित दोन्ही संस्थाशी दूरध्वनीद्वारा चौकशी व खात्री करण्यात आली. निविदाकार यांनी असेही नमुद केले आहे की, मे. एकॉम इंडिया प्रा. लि. व मे. एकॉम एशिया कं. लि. यांची मुळ कंपनी मे. एकॉम असून त्यांचे मुख्य कार्यालय LOS Angeles, USA येथे आहे, अशा प्रकारचे US दुतावांसाकडुन निर्गमित झालेले प्रमाणपत्र दिले आहे.

५.१८ सबब मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम यांनी दिनांक २३ जुलै, २०२० रोजीच्या भारत सरकारच्या कार्यालयीन आदेशानुसार सक्षम प्राधिकरणाकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यांना स्विकृतीपत्र (LOA) देण्यात येईल.

५.१९ वरील प्रस्तावावर चर्चा करताना श्री.जयंत कुमार बाँठीया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी कराराच्या कालावधीत कराराची किंमत बदलेल का? अशी विचारणा केली. यावर श्री.प्रमोद अहुजा, संचालक (कामे) यांनी माहिती दिली की, साधारण सल्लागाराची निविदा Man-Month वर आधारित आहे. तसेच, साधारण सल्लागाराकडून कामाच्या आवश्यकतेनुसार मनुष्य बळाची नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे कराराची किंमत ही प्रकल्प कालावधीत लागणाऱ्या Man-Month वर अवलंबून असेल.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४१०:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग-१० (गायमुख - शिवाजी चौक (मीरा रोड)) आणि मेट्रो मार्ग-१२ (कल्याण-तळोजा) या दोन्ही मेट्रो मार्गांच्या स्थापत्य कामांच्या अंमलबजावणीकरिता साधारण सल्लागार

म्हणून मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा. लि. यांचे संयुक्त उपक्रम यांचा रु.१,६५,५३,६३,०५०/- + USD ३०,१२,६००/- सर्व करांसह (वस्तू व सेवाकर वगळता) एवढया किंमतीचा देकार स्विकारण्यास व मेट्रो मार्ग १० व १२ च्या स्थापत्य कामांसाठी साधारण सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, मेसर्स एकॉम एशिया कंपनी लिमिटेड आणि मेसर्स एकॉम इंडिया प्रा.लि. यांचे संयुक्त उपक्रम यांनी वित्त विभाग, भारत सरकारच्या दिनांक २३ जुलै, २०२० च्या कार्यालयीन आदेशानुसार सक्षम प्राधिकरणाकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यांना स्विकृतीपत्र (LOA) देण्यास मान्यता देत आहे."

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलांसह अधिदान करण्यास आणि वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ६ : मुंबई मेट्रो मार्ग-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) च्या धोरणात्मक संपादन करण्याकरीता सल्लागार नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) मार्गिकेची अंमलबजावणी सार्वजनिक-खाजगी-भागीदारी (PPP) / बांधा, वापरा, स्वामित्व घ्या आणि हस्तांरित करा (BOOT) या धर्तीवर करण्यात आली आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या पूर्णपणे उन्नत मार्गिकेसाठी मुंबई मेट्रो वन प्रा.लि. (MMOPL) यांची विशेष उद्दिष्ट वाहन (Special Purpose Vehicle) संस्था म्हणून रेल्वे आधारीत सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्था (MRTS) रचना, बांधकाम, कार्यान्वयन आणि देखभाल करण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे. विशेष उद्दिष्ट वाहन मे. मुंबई मेट्रो वन प्रा.लि. (MMOPL) मध्ये मुं. म. प्र. वि. प्राधिकरण, रिलायंन्स इन्फ्रा. लि. यांचा २६%, ७४% या प्रमाणात समभाग (Equity) आहे. दिनांक ०७ मार्च, २००७ रोजी मुं. म. प्र. वि. प्राधिकरण, मे. मुंबई मेट्रो वन प्रा.लि. दरम्यान सवलत करार (Concession Agreement) करण्यात आला. सदर दिनांकापासून सवलत कराराचा कालावधी हा एकूण ३५ वर्षांचा आहे

(बांधकाम कालावधीसह). मुंबई मेट्रो मार्ग-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) या मार्गिकेचे व्यावसायिक परिचलन दिनांक ८ जून, २०१४ रोजी सुरु झाले आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २६५व्या बैठकीत मुंबई मेट्रो मार्ग-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) याकरीता धोरणात्मक संपादन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर मार्गिकेच्या कामगिरी मूल्यांकन अहवालाचा अभ्यास करण्यासाठी सल्लागार नियुक्तीचा निर्णयही घेण्यात आलेला आहे. या अनुषंगाने, प्राधिकरणाद्वारे अग्रगण्य वर्तमान पत्रात जाहिराती देऊन मुंबई मेट्रो मार्ग-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) च्या धोरणात्मक संपादन करण्याकरीता सल्लागार नियुक्तीसाठी निविदा मागविण्यात आलेल्या निविदांची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे :-

१. मूल्यांकन अभ्यासाचा कालावधी -१२ आठवडे

२. निवड प्रक्रिया - किमान किंमत निवड (Least Cost Selection)

सदर निविदा प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार निविदा उघडण्यात आल्या असून खालील नमुद संस्थांनी निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेतला :-

१. मे. इन्नोव्हेस्ट अॅडव्हायझरी सर्व्हिसेस प्रायव्हेट लि.

२. मे. रुद्राभिषेक इंटरप्राईजेस लि. सह मे. रीना कन्सल्टिंग एसपीए (संयुक्तपणे)

३. मे. नानगिया अँड कंपनी एलएलपी सह मे. इन्फ्रोनोमिक्स कन्सल्टिंग एलएलपी (संयुक्तपणे)

४. मे. ऑक्टस ऍडवायजर प्रा. लि. सह मे. लिंकलीगल इंडिया लॉ सर्व्हिसेस (संयुक्तपणे)

५. मे. कॅपिटल फॉर्च्यून्स प्रायव्हेट लि. सह मे. अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लि. आणि मे. अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (संयुक्तपणे)

६. मे. अर्न्स्ट अँड यंग एलएलपी

६.३ निविदा शिफारस समितीने केलेल्या तांत्रिक प्रस्तावांच्या सखोल तपासणीनंतर असे दिसून आले की, १) मे. कॅपिटल फॉर्च्यून्स प्रायव्हेट लि. सह मे. अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लि. आणि मे. अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (संयुक्तपणे) (२) मे. अर्न्स्ट अँड यंग एलएलपी यांच्याकडे तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदा आहेत.

६.४ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदा शिफारस समितीच्या मान्यतेनंतर (१) मे. कॅपिटल फॉर्च्यून्स प्रायव्हेट लि. सह मे. अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लि. आणि मे. अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (संयुक्तपणे) (२) मे. अर्न्स्ट अँड यंग एलएलपी यांचा लिफाफा-क (वित्तीय निविदा) उघडण्यात आला.

सदर आर्थिक देकारांची माहिती खालील तक्त्यात नमुद करण्यात येत आहे :

| अ. क्र. | कंपनी / संस्थांचे नाव | सादर केलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. कॅपिटल फॉर्च्यून्स प्रायव्हेट लि. सह मे. अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लि. आणि मे. अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (संयुक्तपणे) | रु. १,३७,३७,५०० + GST | L १ (लघुत्तम निविदाकार) |
| २. | मे. अर्न्स्ट अँड यंग एलएलपी | रु. ५,०१,००,००० + GST | L २ |

६.५ तद्नंतर महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, वरील तक्त्यानुसार मे. कॅपिटल फॉर्च्यून्स प्रायव्हेट लि. सह मे. अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लि. आणि मे. अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (संयुक्तपणे) यांनी कमी दर सादर केल्याने तसेच त्यांना आवश्यक अनुभव असल्याने सदर मुंबई मेट्रो मार्ग-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) च्या धोरणात्मक संपादन करण्याकरीता सल्लागार म्हणून रु.१,३७,३७,५००+ वस्तु व सेवाकर या दराने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४११ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून कार्यकारी समिती याव्दारे, मुंबई मेट्रो मार्ग-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) च्या धोरणात्मक संपादन करण्याकरीता सल्लागार नियुक्तीसाठी मे. कॅपिटल फॉर्च्यून्स प्रायव्हेट लि. सह मे. अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लि. आणि मे. अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (संयुक्तपणे) यांची रु. १,३७,३७,५००+ वस्तु व सेवाकर शुल्कावर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र. ७ : 'मुंबई आय' प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता व्यवहार्यपूर्वाभ्यास करणे, तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करणे, जागेची निवड करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा करणे व एजन्सीच्या निवडीसाठी निविदा प्रक्रिया व्यवस्थापन राबविणे आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणे याकरिता सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.**

७.१ महानगर आयुक्त यांनी वरील विषयाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मा.मुख्यमंत्री यांनी प्राधिकरणास वांद्रे-वरळी सागरी सेतू लगत वांद्रे रेक्लेमेशन येथे लंडन आय च्या धर्तीवर 'मुंबई आय' प्रकल्पाची प्रक्रिया सुरु करण्याचे निर्देश दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत दिले होते. सदर प्रकल्पाची संकल्प चित्र बनविणे, बांधणे, अर्थसहाय्य करणे, देखभाल करणे आणि हस्तांतरित करणे (DBFOMT ) यास शासनाने दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी मंजूरी दिली. प्राधिकरणाने अंदाजे १२० ते १३० मी. व्यासाचा आकाश पाळणा (Ferris wheel) बांधण्याच्या दृष्टीने प्रकल्प खर्च रु.१,०००/- कोटी इतका गृहीत धरुन लघुत्तम किंमत निवड पध्दतीने (Least Cost Selection) सल्लागार नेमण्याबाबत प्रस्ताव महानगर आयुक्त यांनी सादर केला.

**७.२ प्रस्ताव :**

प्राधिकरणामार्फत मुंबई आय प्रकल्पासाठी तीन निविदाकारांचा (भागीदारासंह) प्रतिसाद प्राप्त झाला. त्या संबंधीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | मुख्य निविदाकाराचे नाव | भागिदार संस्थांचे नाव |
|---|---|---|
| अ | मे. अॅक्वाग्रिन इंजिनिअरिंग मॅनेजमेंट प्रा. लि. | १. मे. वेरनर सोबेक फ्रँकफ्रट GmbH & Co. KG<br>२. मे. रोप्स GmbH |
| ब | मे. मेस प्रोजेक्ट अॅण्ड कॉस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. | १. मे. चॅपमन टेलर इंडिया LLP<br>२. मे. अॅनारॉक प्रॉपर्टी कन्सल्टंट प्रा. लि. |
| क | मे. स्किल ट्री कन्सल्टींग प्रा. लि. | १. मे. परकिंन्स इस्टमन आर्कीटेक्ट<br>२. मे. स्टारनेथ होल्डींग BV |

प्राप्त निविदांचे मुल्यांकन करण्यासाठी अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे तपासणी / मुल्यांकन समिती स्थापन केली :-

| | |
|---|---|
| अ) अति. महानगर आयुक्त-२, मुं.म.प्र.वि.प्रा | अध्यक्ष |
| ब) प्रमुख, नियोजन विभाग, मुं.म.प्र.वि.प्रा | सदस्य |
| क) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुं.म.प्र.वि.प्रा | सदस्य |
| ड) वित्तीय सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा | सदस्य |
| ई) मुख्य अभियंता, सां.ब.वि , मुंबई विभाग, | सदस्य |

निविदांची छाननी नंतर सर्व तीन निविदाकारांमार्फत निविदा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या पूर्व-पात्रता निकषांची पुर्तता केल्यामुळे तांत्रिक छाननीकरीता पात्र ठरविण्यात आले होते. तिन्ही निविदाकारांनी तांत्रिक छाननीमध्ये आवश्यक असलेले ७५ पेक्षा जास्त गुण प्राप्त केल्यामुळे त्यांना तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरविण्यात आले होते आणि त्यांचे वित्तीय लिफाफे उघडण्यास शिफारस करण्यात आली होती.

**अ. वित्तीय प्रस्तावाची छाननी**

सदर निविदांची वित्तीय प्रस्तावांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | मे. ॲक्वाग्रिन | मे. मेस | मे. स्किल ट्री |
|---|---|---|---|
| १ | रू. ३३,९६,४९,००६.२५ | रु. ९८,८९,५७,६०३/- | रू. १७,७३,००,०००/- |
| २ | L२ | L३ | **L१ (लघुत्तम निविदाकार)** |

**ब. मुल्यांकन समितीचा अहवाल:**

मुल्यांकन समितीने प्राप्त झालेल्या वित्तीय प्रस्तावाची छाननी केल्यानंतर मे. स्किल ट्री कन्सल्टींग प्रा. लि. हे वित्तीय प्रस्तावानुसार लघुत्तम निविदाकार असल्याचे दिसून आले. मुल्यांकन समितीने दिलेल्या निर्देशानुसार लघुत्तम निविदाकारासोबत वित्तीय प्रस्तावाबाबत वाटाघाटी करण्यात आल्या. त्या अनुषंगाने लघुत्तम निविदाकाराने रु.१७,५५,००,०००/- इतका सुधारित वित्तीय प्रस्ताव सादर केला. सदर सुधारित वित्तीय प्रस्तावामुळे प्रस्तावापेक्षा रु.१८,००,०००/- इतका कमी असून देखील, प्राधिकरणाच्या मुळ अंदाजित रु.४,९०,१०,०००/- रक्कमेपेक्षा जास्त असल्याचे मुल्यांकन समितीच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने खालील बाबींचे स्पष्टीकरण मुल्यांकन समितीस सादर करण्यात आले.

अ. आकाश पाळणा (Ferris wheel) हा भारतामध्ये एक नावीन्यपूर्ण प्रकल्प असून, प्रकल्पाच्या विशिष्ठ स्वरुपामुळे, समान स्वरुपाचा अनुभव असणारे तांत्रिक मनुष्यबळ भारतामध्ये उपलब्ध नाही.

ब. प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजामध्ये सल्लागार नियुक्तीवर होणारा खर्च भारतामध्ये प्रचलित तांत्रिक मनुष्यबळास देण्यात येणारे मासिक मानधन विचारात घेऊन तयार करण्यात आला होता. सदर अंदाजामध्ये १३३ आठवडे (४ महीने + ४ महीने + २४ महीने) इतका कालावधी गृहीत धरुन रू.४.९१ कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. तद्नंतर निविदाकारांच्या विनंतीनुसार सदर

निविदेचा कालावधी १४६ आठवडे (७.५ महीने + ३ महीने + २४ महीने) इतका सुधारित करण्यात आला. त्यानुसार अंदाजपत्रक साधारणत: रु.५.१२ कोटी एवढे सुधारीत होईल.

क. आंतरराष्ट्रीय अनुभव व ख्याती असलेल्या सल्लागाराची निवड करण्यासाठी जागतिक स्तरावरावरुन निविदा आमंत्रित केल्या होत्या. प्राधिकरणामार्फत ई-निविदा प्रणालीव्दारे संपूर्ण निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आली. या प्रक्रियेत प्राप्त झालेल्या सर्व निविदांमध्ये परदेशातील भागीदार आहेत आणि सल्लागारांद्वारे नेमणूक करण्यात येणारे ८५ % तांत्रिक मनुष्यबळ हे परदेशातील आहेत.

ड. सल्लागारामार्फत प्राप्त झालेल्या वित्तीय प्रस्ताव संबंधित देशामध्ये अदा करण्यात येणाऱ्या मानधनावर आधारित आहे. तथापि, प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकामध्ये परदेशातील तांत्रिक मनुष्यबळास अदा करण्यात येणाऱ्या व्यावसायिक शुल्क संरचनेचा विचार करण्यात आला नव्हता.

इ. प्राधिकरणाने जगभरातील विविध आकाश पाळणे (Ferris wheel), त्यांचा व्यास, उंची आणि बांधकाम खर्च इत्यादिंची माहिती घेण्यासाठी गूगल या सांकेतिक स्थळाचा आधार घेतला होता. सन २०२० च्या प्रचलित किंमतीं लक्षात घेता, १२० मी. व्यास असलेल्या आकाश पाळण्याची किंमत किमान रु.१००० कोटी असल्याचे आढळून आले म्हणून प्रकल्पाची एकूण किंमत अंदाजे रु.१००० कोटी इतकी विचारात घेतली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत दिनांक २५ जानेवारी, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये, सल्लागाराच्या नेमणुकीबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर निर्णयाच्या परिशिष्ट 'ब' च्या तक्ता क्र. २ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार देण्यात येणारी सल्लागार शुल्क, प्रकल्पाच्या आकारांवर आधारित आहे. मोठे प्रकल्प (५०० कोटी आणि त्याहून अधिक किंमतीसाठी - २% शुल्क), मध्यम प्रकल्प (१०० कोटी - ५०० कोटी किंमतीसाठी - ३% शुल्क) आणि लघु प्रकल्प (१०० कोटी पेक्षा कमी किंमतीसाठी - ४% शुल्क) इतकी प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु.१,००० कोटी इतका विचारात घेतल्यास, या प्रकल्पासाठी सल्लागार शुल्क हे रुपये १,००० कोटीचे २% म्हणजेच २० कोटी असू शकले असते. लघुत्तम निविदाकारामार्फत वित्तीय प्रस्तावामध्ये सादर केलेली रक्कम रुपये १७.५५ कोटी ही रुपये २० कोटी पेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

ई. प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक हे साधारणत: भारतामध्ये अपेक्षित मनुष्यबळ आणि त्यांचे मासिक/आठवड्याचे दर व आवश्यकता यावर आधारित आहे. निविदा प्रस्तावामध्ये नमूद केल्याप्रमाणे टप्पा-१ (७.५ महिने), टप्पा २ (३- महिने) आणि टप्पा ३ (२४ महिने) कामांची यशस्वी पूर्तता करण्यासाठी

त्यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची निवड करण्याचे स्वातंत्र्य निविदाकारास दिले होते. त्यामुळे निविदाकारामार्फत निविदा प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आलेल्या कामाची व्याप्ती व विहित मुदतीमध्ये प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळाची नेमणूक व त्यांचे दर त्यांच्या गरजेनुसार नमूद करण्यात आले आहे. त्यामूळे सर्वच निविदाकारांनी त्यांच्या स्तरावर मनुष्यबळाची निवड करुन वित्तीय प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामुळे सदर वित्तीय प्रस्तावांची तुलना प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजाशी करणे शक्य होत नाही. निविदाकारांकडून प्राप्त झालेल्या तीन वित्तीय प्रस्ताव, अनुक्रमे मे. मेस प्रोजेक्ट व कॉस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. यांचे रु.९८.८९ कोटी, मे. ॲक्वाग्रीन इंजिनिअरिंग मॅनेजमेंट प्रा. लि. यांचे रु.३३.९६ कोटी आणि मे. स्किल ट्री कन्सल्टिंग प्रा. लि. यांचे रु.१७.७३ कोटी असे होते. मे. स्किल ट्री कन्सल्टिंग प्रा. लि. रु.१७.७३ कोटीच्या प्रस्तावासह (L-१) लघुत्तम निविदाकार ठरले. प्राधिकरणासोबत वाटाघाटीनंतर मे.स्किल ट्री कन्सल्टिंग प्रा. लि. यांनी रु.१७.५५ कोटी इतक्या किंमतीचा सुधारीत वित्तीय प्रस्ताव सादर केला आहे.

७.३ निविदा मुल्यांकन समितीने वरील बाबीस सहमती दर्शविली असून, मे. स्किल ट्री कन्सल्टिंग प्रा. लिमिटेड यांना त्यांच्या सुधारीत वित्तीय प्रस्तावाच्या अनुषंगाने लघुत्तम निविदाकार ठरविण्याबाबत सदर समितीने केलेली शिफारस लक्षात घेऊन "मुंबई आय" प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता व्यवहार्य पूर्वाभ्यास करणे, तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करणे, जागेची निवड करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा करणे व एजन्सीच्या निवडीसाठी निविदा प्रक्रिया व्यवस्थापन राबविणे आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविण्यासाठी पुढील ठराव मंजूर केला :-

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४१२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांच्या वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे निविदा तपासणी / मुल्यांकन समितीने शिफारस केल्यानुसार मे. स्किल ट्री कन्सल्टिंग प्रा. लि. यांची रु. १७.५५ कोटीच्या सुधारीत वित्तीय प्रस्तावासह "मुंबई आय" प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी वरील प्रस्तावानुसार प्राधिकरणाचे सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येतो की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ८ : पश्चिम द्रुतगती मार्गावरील Domestic and International Airport येथे नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) करीता उन्नत (Flyover)/भुयारी मार्ग (Vehicular Underpass).**

**१. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आंतरराज्यीय (डोमॅस्टीक) टर्मिनल (T१) जंक्शन जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर भूयारी मार्गाचे बांधकाम करणे आणि कि.मी.५+३०० ते कि.मी.६+१०० मधील उड्डाणपूलाचे रूंदीकरणाचे बांधकाम करणे व सुधारीकरण करणे — द्वितीय बोली**

**२. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) टर्मिनल जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर कि.मी. ६+१४० ते कि.मी. ६+९५० येथे भूयारी मार्गाचे बांधकाम करणे व सुधारणा करणे — द्वितीय बोली**

**- वरील दोन्ही प्रस्तावित कामाच्या निविदाकाराच्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

८.१ महानगर आयुक्त यांनी सदर माहिती देताना असे सांगितले की, परिवहन व वाहतूक सेवामधील सुधारणांच्या उपाय योजनांमुळे पश्चिम द्रुतगती महामार्ग हा पुर्णत: नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) होणार आहे.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, M/s. Louis Berger Consulting Private Limited यांनी विविध पर्यायांचा अभ्यास करून अंतिमत: पश्चिम द्रुतगती मार्गावरील Domestic and International Airport येथे नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) करीता उन्नत (Flyover) /भुयारी वाहन मार्ग (Underpass) प्राधिकरणाच्या मान्यतेने अंतिम करण्यात आले व या दोन्ही नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग व उन्नत मार्ग या कामांकरीता तपशीलवार अंदाजपत्रक (Detailed Estimate) (१. रु.७६.०६ कोटी व २. रु.१५१.९२ कोटी) मिळून **रु.२२७.९७** कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १५०व्या बैठकीत मान्यता प्राप्त झालेली आहे.

८.३ महानगर आयुक्त यांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ अंतर्गत आंतरराज्यीय टर्मिनल (T१) (Domestic) काम क्र.१ व आंतरराष्ट्रीय टर्मिनल (T२) (International) काम क्र.२ बद्दल खालीलप्रमाणे माहिती दिली :-

**काम क्र.१ च्या प्रकल्पाचे स्वरूप** :-

वांद्रे मुंबईकडून छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्याकरीता (-१ level) खाली ०.३८४ किमी.व १०.२५ मी.रुंदीचा २ लेन ड्रेनसह नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग. तसेच दहिसरकडून मुंबई वांद्रेकडे येण्याकरीता ०.४५८ कि.मी.व ३.५ मी.रुंदीचा १ लेन उन्नत मार्ग अस्तित्वातील उन्नत मार्गाशी समकक्ष व वांद्रे मुंबईकडून दहिसरकडे जाण्याकरीता ०.२३९ किमी.व ३.५ मी. रुंदीचा १ लेन उन्नत मार्ग अस्तित्वातील उन्नत मार्गाशी समकक्ष ड्रेनसह प्रस्तावित केलेला आहे.

**प्रकल्पाचे फायदे** :-

वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी वांद्रे येथून आंतरराज्यीय विमानतळावर जाण्याकरीता (-१ level) या भुयारी मार्गामुळे फ्री राईट टर्न उपलब्ध होईल, सिग्नल टाईमिंग कमी होईल व वाहतुक सुरळीत होईल. सद्याच्या जुहू-विले पार्ले उन्नत मार्गाला १ लेन दहिसरकडे जाण्याकरीता व १ लेन वांद्रे येथे जाण्याकरीता अधिक प्रस्तावित करत आहोत. ज्यामुळे उन्नत मार्गाच्या रहदारीची क्षमता वाढेल.

पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समस्यांवर मात करुन सुरक्षिततेसह भुयारी मार्गाने ४० कि.मी. प्रती तास वेगाने प्रवास करता येईल व होणारा विलंब व प्रदूषण कमी होईल तसेच प्रवाशांचा प्रवास आरामदायक, सुखद व वेळेत होईल.

८.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) टर्मिनल जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर कि.मी. ६ + १४० ते कि.मी. ६ + ९५० येथे भुयारी मार्गांचे बांधकाम करणे व सुधारणा करणे.

**काम क्र.२ च्या प्रकल्पाचे स्वरूप** :

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दहिसरकडे जाण्याकरीता (-2 level) खाली १.०३५ कि.मी.व १०.२५ मी.रुंदीचा २ लेन ड्रेनसह नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग तसेच (-1 level) वांद्रे मुंबईच्या दिशेने जाण्याकरीता ०.५०५ कि.मी.व १०.२५ मी.रुंदीचा २ लेन ड्रेनसह नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग प्रस्तावित केलेला आहे.

**प्रकल्पाचे फायदे :**

सद्य:स्थितीत आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून दहिसरकडे जाण्यासाठी फ्री लेफ्ट घेवून आंतरराज्यीय विमानतळाच्या जंक्शनपर्यंत जाऊन यु टर्न घ्यावा लागतो, यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतुक कोंडी होते. ही कोंडी दुर करण्यासाठी (-२ level) आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून दहिसरला जाण्याकरीता भुयारी मार्ग प्रस्तावित केला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून वांद्रे येथे जाण्यासाठी (-1 level) भुयारी मार्ग प्रस्तावित केला आहे. या दोन्ही भुयारी मार्गांमुळे आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून वांद्रे येथे व दहिसरकडे जाणाऱ्या पश्चिम द्रुतगती महामार्गावर जलद गतीने जाण्यासाठी उपयुक्त ठरेल तसेच वाहतुक कोंडी कमी होऊन रहदारीची क्षमता वाढेल. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समस्यांवर मात करुन सुरक्षिततेसह भुयारी मार्गांनी ४० कि.मी. प्रती तास वेगाने प्रवास करता येईल व होणारा विलंब व प्रदूषण कमी होईल तसेच प्रवाशांचा प्रवास आरामदायक, सुखद व वेळेत होईल.

८.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या दोन्ही कामांकरीता टक्केवारी दरावर (EPC MODE) कंत्राटदारांच्या दोन स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या. सदर दोन्ही कामांचा पुर्णत्वाचा व दोष दायित्व कालावधी खालीलप्रमाणे :-

सदर दोन्ही कामांच्या स्वतंत्र ई-निविदा (द्वितीय बोली) सूचना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व ई-निविदा पोर्टलवर दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या. इच्छुक निविदाकारांसमवेत दोन्ही कामांच्या निविदापूर्व बैठक दिनांक ०४ मार्च, २०२१ रोजी आयोजित करण्यात आल्या व त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दांचा खुलासा व सामाईक बदल संच दिनांक ०८ मार्च, २०२१, १० मार्च, २०२१ व १२ मार्च, २०२१ रोजी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या. यामध्ये दोंन्ही कामांच्या सभोवतालची संरचना व बांधकामे, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा भूयारी पादचारी मार्ग इत्यादी बाबी लक्षात घेवून प्रकल्प सल्लागाराने सुचित केल्याप्रमाणे निविदाकारांमार्फत खडक खोदाईकरीता Pulse Plasma Technology च्या पुरवठादारासोबत करारनामा (MOU) सादर करणे अनिवार्य होते.

काम क्र.१ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आंतरराज्यीय (डोमॅस्टीक) टर्मिनल (T१) जंक्शन (द्वितीय बोली) —

निविदा रक्कम रु. ५६,०४,१९,५६०/- (वस्तू व सेवा कर वगळून)

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | आर्थिक देकार रक्कम (रु.) वस्तू व सेवा कर वगळून | दराची टक्केवारी (EPC MODE) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. | ६३,७२,००,०००/- | १३.७०% (जास्त दर) | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. एस.एम.एस. इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ७४,१६,०३,७८६/- | ३२.३३% (जास्त दर) | व्दितीय लघुत्तम |
| ३ | मे. मिशिगन इंजिनियर्स प्रा.लि. इंजिनियर्स प्रा.लि. | ७५,१०,७४,८८४/- | ३४.०१% (जास्त दर) | तृतीय लघुत्तम |
| ४ | मे. युनिक कन्स्ट्रक्शन | ७६,९७,४८,९५४/- | ३७.३४% (जास्त दर) | चतुर्थ लघुत्तम |

प्राप्त देकारात मे आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांचा रु. ६३,७२,००,०००/- (वस्तू व सेवा कर वगळून) किंमतीचा आर्थिक देकार अंदाजित किमतीच्या १३.७०%जास्त दराने आहे.

काम क्र. २ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) टर्मिनल (द्वितीय बोली) -

निविदा रक्कम रु. १११,९४,३६,९८०/- (वस्तू व सेवा कर वगळून)

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | आर्थिक देकार रक्कम (रु.) वस्तू व सेवा कर वगळून | दराची टक्केवारी (EPC MODE) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. | १२५,५५,००,०००/- | १२.१५% (जास्त दर) | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. एस.एम.एस. इन्फ्रास्ट्रक्चर लि. | १४८,१३,०२,०२०/- | ३२.३३% (जास्त दर) | व्दितीय लघुत्तम |
| ३ | मे. मिशिगन इंजिनियर्स प्रा.लि. | १५०,०२,१९,८८०/- | ३४.०१% (जास्त दर) | तृतीय लघुत्तम |
| ४ | मे. युनिक कन्स्ट्रक्शन | १५३,७७,१९,७८०/- | ३७.३६ % (जास्त दर) | चतुर्थ लघुत्तम |

प्राप्त देकारात मे. आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांचा रु.१२५,५५,००,०००/- (वस्तू व सेवा कर वगळून)किंमतीचा आर्थिक देकार अंदाजित किमतीच्या १२.१५%जास्त दराने आहे.

८.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर दोन्ही स्वतंत्र कामांच्या स्वतंत्र निविदा (द्वितीय बोली) स्विकारण्यासाठी निविदा शिफारस समिती बैठक -३ दिनांक १६ एप्रिल, २०२१ रोजी महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. निविदा शिफारस समितीच्या

बैठकीमध्ये निविदाकाराने दिलेल्या जास्त दराबाबत कारणीमिमांसा पत्र व प्रकल्प सल्लागार यांनी सहमती दर्शविलेले दर व निविदाकारासोबत झालेल्या वाटाघाटी विचारात घेऊन **काम क्र.१ करीता ९.४९% अधिक दराने (रु.६१,३६,००,०००/- वस्तु व सेवा कर वगळून)** व **काम क्र.२ करीता ९.४९% अधिक दराने (रु.१२२,५७,८०,०००/- वस्तु व सेवा कर वगळून) निविदा स्विकारण्यास सहमती दर्शविली.**

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४१३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेशातंर्गत येणाऱ्या विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत,

काम क्र.१ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आंतरराज्यीय (डोमॅस्टिक) टर्मिनल (T१) जंक्शन जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर भूयारी मार्गाचे बांधकाम करणे आणि कि.मी. ५+३०० ते कि.मी. ६+१०० मधील उड्डाणपुलाचे रुंदीकरणाचे बांधकाम करणे व सुधारणा करणे (द्वितीय बोली) या प्रस्तावित कामांसाठी मे. आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांची लघुत्तम निविदा रक्कम रु.६१,३६,००,०००/- (वस्तू व सेवा कर वगळून) एक रक्कमी दर EPC Mode) ही अंदाजित रक्कम रु.५६,०४,१९,५६०/-(वस्तू व सेवा कर वगळून) पेक्षा रक्कम ९.४९% अधिक दर.

काम क्र.२ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्टीय विमानतळ (T२) टर्मिनल जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर किमी ६+१४० ते किमी ६+९५० येथे भूयारी मार्गाचे बांधकाम करणे व सुधारणा करणे (द्वितीय बोली) या प्रस्तावित कामांसाठी मे. आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.यांची लघुत्तम निविदा रक्कम रु.१२२,५७,८०,०००/-(वस्तू व सेवा कर वगळून एक रक्कमी दर EPC Mode) ही अंदाजित रक्कम रु.१११,९४,३६,९८०/- पेक्षा रक्कम ९.४९% जास्त दर.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील दोन्ही स्वतंत्र कामांसाठी स्वतंत्र लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणारा अधिक निविदेनुसार देय भाववाढ संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**“आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या सर्व फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ९ : मंडाले, मुंबई येथील मेट्रो डेपोत कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामासाठी मागविलेल्या ई-निविदेसाठी मंजुरी देणेबाबत**

९.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावावर सादरीकरण करताना असे सांगितले की, मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) व मेट्रो मार्ग २अ दहिसर (पूर्व) ते अंधेरी (पश्चिम) चे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच मेट्रो मार्ग-२ब, ४, ४अ, ५, ६, ७अ आणि मेट्रो मार्ग ९ यांची स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत. मेट्रो मार्गिकेच्या देखभाल दुरुस्तीसाठी साधारणत: ३४ कर्मचारी प्रति कि.मी. आवश्यक आहेत. त्यापैकी अत्यावश्यक सेवेसाठी ३०% कर्मचाऱ्यांचा विचार करून मालवणी व मंडाळे मेट्रो डेपोमध्ये १BHK, २BHK, ३BHK असे प्रत्येकी वीस मजल्यांच्या तीन बहुमजली इमारती कर्मचारी निवासस्थानांसाठी प्रस्तावित आहेत. मालवणी व मंडाळे येथील कर्मचारी निवासस्थानांच्या आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व बांधकाम पर्यवेक्षण इ. कामांसाठी सल्लागार मे. टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत सदर कामाची निविदा बनविणे, त्याचे अंदाजपत्रक बनविणे, निविदेची तांत्रिक छाननी इ. कामे करण्यात आली आहेत. त्यानुषंगाने मंडाळे येथील कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामाकरिता, ई-निविदा मागविण्यासाठी “Indian Express” इंग्रजी व मराठी दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात दिनांक २५ डिसेंबर, २०२० रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली व ती प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आली. निविदा पूर्व बैठक दिनांक ०५ जानेवारी, २०२१ रोजी घेण्यात आली. निविदा पूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. निविदा प्रक्रियेमध्ये केंद्र सरकारच्या दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० च्या मार्गदर्शक सूचनेनुसार इसारा रक्कम (EMD) न घेता त्याचे हमीपत्र घेणे, सुरक्षा रक्कम (Performance Security) ३% घेणे तसेच अतिरिक्त सुरक्षा रक्कम (Additional Security Deposit) न घेणे या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ होती. त्यानुसार दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता लिफाफा ‘अ’ (निविदा किंमत) व ब’ (तांत्रिक

प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | मे. कल्पना स्ट्रकॉन प्रा.लि. |
| २ | मे. एन.ए. कंस्ट्रक्शन प्रा. लि. |
| ३ | मे. अहलुवालिया कॉंट्रॅक्टस (इंडिया) लि. |
| ४ | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. |
| ५ | मे. कॅपॅसिट इंफ्राप्रोजेक्टस लि. |
| ६ | मे. वित्राग इन्फ्रा. प्रोजेक्ट. लि. |
| ७ | मे. सी.बी. अँड सन्स कंन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. |
| ८ | मे. देव इंजिनिअर्स |
| ९ | मे. डी.एस. मॅक्स प्रॉपर्टीस् प्रा.लि. |
| १० | मे. जेनेरिक इंजिनीरिंग कंन्स्ट्रक्शन्स अँड प्रोजेक्टस लि. |
| ११ | मे. हिमकॉंन इंजिनिअर्स इंडिया प्रा. लि. |
| १२ | मे. आर.ई. इन्फ्रा प्रा.लि. |
| १३ | मे. स्टेनर इंडिया लि. |

९.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राप्त ई निविदांच्या पात्रतेची तांत्रिक छाननी सल्लागार मे. टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत करण्यात आली. सदर छाननीचा अहवाल निविदा शिफारस समितीस सादर करण्यात आला. सदर समितीने शिफारस केल्याप्रमाणे तांत्रिक छाननी अंतर्गत खालील दोन निविदाकारांना अपात्र ठरविण्यात आले.

अ) मे. सी.बी. अँड सन्स कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी पात्रतेकरिता सादर केलेल्या निविदा दस्तऐवजामध्ये उल्लेख केलेल्या तीन कामांपैकी एक काम अजूनही प्रगतीपथावर असून ते काम दिनांक ३० नोव्हेंबर, ११.२०२० पर्यंत ८०% पूर्ण झालेले नाही. निविदेच्या अटीप्रमाणे जे काम ८०% पूर्ण झाले आहे तेच काम अनुभवाच्या पात्रतेसाठी ग्राहय धरण्यात येईल. तसेच त्यांनी सादर केलेले एक काम दिनांक ३० नोव्हेंबर, २०२० पर्यंत ८२.६४% पुर्ण झालेले असले तरी त्या कामाची किंमत रु.३६.६८ कोटी इतकी असून ती रक्कम निविदेच्या अटीनुसार रु.३७.६६ कोटी पेक्षा कमी आहे. निविदाकाराने सादर केलेली वरील दोन्ही कामे निविदेच्या अटीप्रमाणे नसल्याकारणाने मे. सी.बी. अँड सन्स कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

ब) मे. स्टेनर इंडिया लि. या कंपनीने निविदेच्या पात्रतेकरिता एका कामाचा तपशिल सादर केला त्या कामाची पूर्णत्वाची किंमत रु.५२.२१ कोटी इतकी असून ती रक्कम निविदा अटीनुसार रु. ७५.३२ कोटी पेक्षा (one work of ८०% of cost put to tender) कमी असल्यामुळे या निविदाकाराची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

तद्नंतर दिनांक ०९ एप्रिल, २०२१ रोजी अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाकारांचा लिफाफा 'क' उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्यानुषंगाने तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा 'क') दिनांक ०९ एप्रिल, २०२१ रोजी उघडण्यात आले. निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) (सर्व करासह) | प्राप्त देकार (रु. कोटी) (सर्व करासह) | % अधिक/ कमी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. हिमकॉन इंजिनिअर्स इंडिया प्रा. लि. | ९४.१४ | ७५.९३ | -१९.३५ | १ |
| २ | मे. वित्राग इन्फ्राप्रोजेक्ट लि. | | ८०.११ | -१४.९१ | २ |
| ३ | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. | | ८६.१८ | -८.४६ | ३ |
| ४ | मे. एन.ए. कस्ट्रक्शन प्रा. लि. | | ८७.६३ | -६.९३ | ४ |
| ५ | मे. कॅपॅसिट इंफ्राप्रोजेक्टस लि. | | ८७.८६ | -६.६८ | ५ |
| ६ | मे. आरई इन्फ्रा प्रा.लि. | | ८८.०१ | -६.५२ | ६ |
| ७ | मे. कल्पना स्ट्रकॉन प्रा.लि. | | ८८.५७ | -५.९३ | ७ |
| ८ | मे. जेनेरिक इंजिनीरिंग कॉन्स्ट्रुकॅशन अँड प्रोजेक्टस लि. | | ९२.८८ | -१.३५ | ८ |
| ९ | मे. देव इंजिनिअर्स | | ९५.५५ | +१.५० | ९ |
| १० | मे. डीएस मॅक्स प्रॉपर्टीस् प्रा.लि. | | १०३.०० | +९.४० | १० |
| ११ | मे. अहलुवालिया कॉंट्रॅक्टस (इंडिया) लि. | | १०५.६३ | +१२.२० | ११ |

९.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर लघुत्तम देकार हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १९.३५% कमी असल्यामुळे मे. हिमकाँन इंजिनिअर्स इंडिया प्रा.लि. यांच्याकडून

दिनांक ०९ एप्रिल, २०२१ रोजी स्पष्टीकरण मागविण्यात आले. त्याबाबत निविदाकाराने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले :-

१. लघुत्तम निविदाकाराचे प्रकल्पाचे काम मुंबई येथे सुरु असून त्यासाठी लागणारी यंत्रणा देखील उपलब्ध आहे. त्यामुळे सदरची यंत्रणा ही प्रस्तावित कामासाठी देखील उपयोगात येईल.
२. लघुत्तम निविदाकाराच्या batching plant, tower cranes, concrete pumps, scaffolding, इत्यादी यंत्रसामुग्री स्वत:च्या मालकीची आहे.
३. लघुत्तम निविदाकाराकडे DG set व पायाभुत सुविधा प्रकल्पासाठी लागणारी यंत्रसामुग्री स्वत:च्या मालकीची आहे.
४. लघुत्तम निविदाकाराचे मुंबईमध्ये एक काम सुरु असून त्यांनी व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीकोनातून तसेच प्रतिष्ठीत संस्थेसोबत काम करण्यासाठी वाजवी दराची निविदा सादर केली आहे.

उपरोक्त स्पष्टीकरणान्वये लघूत्तम निविदाकाराने दिलेला देकार हा तुलनात्मकरीत्या रास्त आहे असे कळविले आहे.

९.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समितीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकडून शिफारस करण्यात आलेल्या वित्तीय छाननी अहवालानुसार लघुत्तम निविदाकाराची मे. हिमकॉंन इंजिनिअर्स इंडिया प्रा. लि. यांच्या रु.७५,९२,६४,४७५/- (अक्षरी रु. पंच्याहत्तर कोटी ब्याण्णव लाख चौसष्ठ हजार चारशे पंच्याहत्तर फक्त) सर्व करांसह निविदा रक्कमेपेक्षा (-) १९.३५% दराने निविदा स्विकारण्याची शिफारस केली.

९.५ याबाबत मा. मुख्य सचिव आणि अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे विचारले की, १९.३५% कमी एवढ्या किंमतीत कामाची गुणवत्ता व काम पूर्ण होऊ शकेल का? त्यावर संचालक (प्रकल्प) मेट्रो यांनी असे सांगितले की, लघुत्तम निविदाकाराचे मुंबईमध्ये एक काम सुरु असून त्यांनी व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीकोनातून तसेच संस्थेसोबत काम करण्यासाठी वाजवी दराची निविदा सादर केली आहे. याबाबत पुढे चर्चा करताना मा. मुख्य सचिव आणि अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी पुढे असे विचारले की, असामान्यपणे कमी निविदा प्राप्त झाल्यामुळे निविदेमध्ये अतिरिक्त सुरक्षा रक्कमेबाबत तरतूद आहे का? यावर खुलासा करताना संचालक (प्रकल्प) मेट्रो यांनी सांगितले की, निविदेमध्ये केंद्र सरकारच्या दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार इसारा रक्कम

(EMD) न घेता त्याचे हमीपत्र घेणे, सुरक्षा रक्कम (Performance Security) ३% घेणे तसेच अतिरिक्त सुरक्षा रक्कम (Additional Security Deposit) न घेणे या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला. याबाबत पुढे मा. मुख्य सचिव आणि अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सुचना केली की, लघुत्तम निविदाकाराकडून वाजवी अतिरिक्त सुरक्षा रक्कम योग्य स्वरूपात घेण्यात यावी.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४१४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मंडाळे, मुंबई येथील मेट्रो डेपोत कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामासाठी मे. हिमकॉन इंजिनिअर्स इंडिया प्रा. लि. यांचा रु. ७५,९२,६४,४७५/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर कोटी ब्याण्णव लाख चौसष्ठ हजार चारशे पंच्याहत्तर फक्त) सर्व करासह (१९.३५% कमीचा) लघुत्तम आर्थिक देकाराची ई-निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. १०: प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते ३१ मार्च, २०२१**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२१ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ११: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील "प्रमुख, नियोजन विभाग" हे पद सरळसेवेने भरणेबाबत.**

११.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, **"प्रमुख, नियोजन विभाग"** हे पद पूर्वीपासून प्राधिकरणाच्या आस्थापनेवर मंजूर पद आहे. सदर पद दिनांक ०१ मार्च, २०२१ पासून रिक्त झाले असून सदरचे पद एकाकी आहे. सदरचे रिक्त पद भरण्याच्या दृष्टीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. जाहिरातीस अनुलक्षून सरळसेवेकरीता ६ उमेदवारांचे आणि प्रतिनियुक्तीकरीता ६ उमेदवारांचे असे एकूण खालील १२ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. १२ उमेदवारांच्या अर्जांची जाहिरातीतील अटी व शर्ती तसेच सेवाप्रवेश नियमानुसार पडताळणी करुन पात्र /अपात्र करण्यात आले आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

**अ) सरळसेवा :-**

| अनु. क्र. | उमेदवाराचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|
| ०१ | श्रीमती परामिता रॉय | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत नाहीत. |
| ०२ | श्री महादेव द. माने | **पात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करतात. |
| ०३ | श्रीमती सुनयना पी. कुंभारे | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व नियोजनमधील १५ वर्षाचा अनुभव धारण करतात. परंतु जबाबदारीच्या पदावरील १० वर्षाचा अनुभव धारण करीत नाहीत. |
| ०४ | श्रीमती पल्लवी अे. परांजपे | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व नियोजनमधील १५ वर्षाचा अनुभव धारण करतात. परंतु जबाबदारीच्या पदावरील १० वर्षाचा अनुभव धारण करीत नाहीत. |
| ०५ | श्रीमती उत्तमा फुलझेले | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व नियोजनमधील १५ वर्षाचा अनुभव धारण करतात. परंतु जबाबदारीच्या पदावरील १० वर्षाचा अनुभव धारण करीत नाहीत. |
| ०६ | श्री.मिलिंद भा. पाटील | **पात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व नियोजन मधील १५ वर्षाचा तसेच जबाबदारीच्या पदावरील १० वर्षाचा अनुभव धारण करतात. |

**ब) प्रतिनियुक्ती :-**

| अनु. क्र. | उमेदवाराचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|
| ०१ | श्री.संजय डोंगर पाटील | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार नियोजनमधील १५ वर्षाचा आणि जबाबदारीच्या पदावरील १० वर्षाचा अनुभव धारण करतात परंतु सदर पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| ०२ | श्रीमती प्रिती पेठे इनामदार | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करतात परंतु त्यांचा अनुभव शासकीय/निमशासकीय कार्यालयातील नसल्यामुळे ते प्रतिनियुक्तीकरीता पात्र ठरत नाहीत. तसेच त्यांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त असल्यामुळे सरळसेवेकरीता पात्र ठरत नाहीत. |
| ०३ | श्री.हिरेन सी.दप्तरदार | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करतात परंतु त्यांच्याकडे अभियांत्रिकी मधील अनुभव आहे. नियोजन मधील अनुभव धारण करीत नाहीत. |
| ०४ | श्री.सुनिलदत्ता एम. रसाळ | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करतात परंतु त्यांच्याकडे अभियांत्रिकी मधील अनुभव आहे. नियोजन मधील अनुभव धारण करीत नाहीत. |
| ०५ | श्री.रविकुमार वेंकटारामा कृष्णा कल्याणम | **पात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेला नियोजनमधील १५ वर्षाचा आणि जबाबदारीच्या पदावरील १० वर्षाचा अनुभव धारण करतात. |
| ०६ | श्रीमती प्रिया कल्याणम | **अपात्र**<br>सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता तसेच नियोजनमधील १५ वर्षाचा अनुभव धारण करतात परंतु जबाबदारीच्या पदावरील १० वर्षाचा अनुभव धारण करीत नाहीत |

११.२ उपरोक्त १२ उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जांस अनुलक्षून सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत असल्याने खालील ३ उमेदवार मुलाखतीस पात्र ठरले :-

**सरळसेवेने**

| **अनु.क्र.** | **उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| १. | श्री. महादेव दशरथ माने |
| २. | श्री. मिलिंद भालचंद्र पाटील |

**प्रतिनियुक्तीने**

| **अनु.क्र.** | **उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| १. | श्री. कल्याणम रविकुमार वेंकटारामा कृष्णा |

११.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, **प्रमुख, नियोजन विभाग** हे पद सरळसेवेने भरण्याकरीता अति. महानगर आयुक्त (२) यांच्या अध्यक्षतेखाली खालील समिती गठित करण्यात आली होती :-

| अ.क्र. | विभागीय निवड समितीचे सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त महानगर आयुक्त (२) | अध्यक्ष |
| २. | सह महानगर आयुक्त | सदस्य |
| ३. | वित्तीय सल्लागार | सदस्य |
| ४. | प्रमुख, नियोजन विभाग (अति.कार्यभार) | सदस्य |
| ५. | श्री.पी.एम.यादव, अति.प्रमुख, नगर रचना | मागासवर्गीयांचे प्रतिनिधी |

११.४ उपरोक्त ३ उमेदवारांच्या विभागीय निवड समितीने दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. ३ उमेदवारांपैकी **"प्रमुख, नियोजन विभाग"** या पदाकरीता अनु.क्र.२ वरील **श्री.मिलिंद भालचंद्र पाटील** यांची विभागीय निवड समितीने एकमताने शिफारस केली आहे.

११.५ श्री. जयंतकुमार बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे नमूद केले की, **"प्रमुख, नियोजन विभाग"** हे पद भरण्याबाबतची विस्तृत माहिती मिळालेली नाही. तसेच सिडको कार्यालयातील श्री.कल्याणम रविकुमार वेंकटरामा कृष्णा हे त्या पदासाठी पात्र असताना त्यांचा विचार का करण्यात आला नाही.

अति.महानगर आयुक्त यांनी श्री. बाँठिया यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सविस्तर माहिती ई-मेलद्वारे देण्यात आल्याचे सांगीतले. तसेच श्री.कल्याणम रविकुमार वेंकटरामा कृष्णा यांची २ वर्ष ९ महिने इतकीच सेवा बाकी असून सेवानिवृत्तीस २ वर्षाचा कालावधी शिल्लक असताना प्रतिनियुक्तीवरील अधिका-याची सेवा मूळ विभागात प्रत्यावर्तित करण्यात येते त्यानुसार श्री.कल्याणम रविकुमार वेंकटरामा कृष्णा यांची फक्त ९ महिने सेवा उपलब्ध होणार होती.

महानगर आयुक्त यांनी याबाबत असे नमूद केले की, श्री.मिलिंद पाटील यांच्याविरुध्द लैंगिक छळाबाबतची तक्रार दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्राधिकरणास प्राप्त झाली. तक्रार अर्जामध्ये सदर घटना ऑक्टोबर, २०११ मध्ये घडल्याचे नमूद करण्यात आले होते. सदर तक्रार प्राधिकरणाच्या महिला तक्रार निवारण समितीकडे सादर करण्यात आली होती. महिला तक्रार समितीने त्यांचा अहवाल दिनांक ०५ ऑगस्ट, २०१६ रोजी सादर केला. महिला तक्रार निवारण समितीच्या शिफारशीस अनुसरुन श्री.पाटील यांना दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. श्री.पाटील यांच्याविरुध्द दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. तद्नंतर प्रकरणातील अंतिम निर्णय घेण्यात येऊन दिनांक २२ मे, २०१७ च्या ज्ञापनाद्वारे श्री.पाटील यांना तक्रारदाराबाबत असलेले वर्तन सुधारावे तसेच तक्रारदारापासून दूर रहावे आणि तक्रारदाराशी कोणताही संपर्क साधू नये अशी समज देऊन याबाबतची नोंद श्री.पाटील यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आली. सद्यस्थितीत श्री.पाटील यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नाही. तद्नंतर, तक्रारदाराने दिनांक २० जुलै, २०१७ रोजी बी.के.सी. पोलीस स्टेशन येथे श्री.पाटील यांच्याविरुध्द लैंगिक छळाबाबतचा गुन्हा दाखल केला होता. तसेच तक्रारदाराने दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी शासनाकडे अपिल सादर केले. सदर अपिलास अनुलक्षून दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२१ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली परंतु सदर सुनावणीचा निकाल प्रलंबित आहे.

श्री.भूषण गगराणी, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग व सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, इतर कार्यालयामधून प्रतिनियुक्तीवर उमेदवार घेण्यापेक्षा संबंधित कार्यालयामधील आवश्यक अनुभव असलेल्या उमेदवाराचा सरळसेवेने अथवा पदोन्नतीने प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे. तसेच अन्य शासकीय कार्यालयातील अधिकारी सरळसेवेने घेऊ नयेत.

११.६ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्ताव संबंधित कागदपत्रासह व तपशीलवार माहितीसह कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येईल असे नमूद केले.

**निर्णय :** चर्चेनंतर, सदर विषय पुढील कार्यकारी समितीच्या बैठकीत घेण्याचे ठरले.

**बाब क्र. १२: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील "प्रमुख, नगर रचना", हे पद पदोन्नतीने भरण्यास मंजुरी देण्याबाबत.**

१२.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना, असे सांगितले की, प्राधिकरणामध्ये २०१५ मध्ये अर्बन डिझाईन संवर्ग निर्माण करण्यात आला आहे परंतु अर्बन डिझाईन विभाग निर्माण करण्यात आला नव्हता. आता नव्याने अर्बन डिझाईन विभाग निर्माण करण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वेतन मॅट्रीक्स स्तर एस-२९ रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीतील **"प्रमुख, नगर नियोजन-२"** हे मंजूर पद असून कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून सदर पदाचे पदनाम **"प्रमुख, नगर रचना"** असे करण्यात आले आहे. **"प्रमुख, नगर नियोजन -२"** या पदाचे खालील सेवाप्रवेश नियम **"प्रमुख, नगर रचना"** या पदाकरीता जसेच्या तसे ठेवण्यात आले आहेत :-

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील "प्रमुख, नगर रचना" या पदावरील नेमणूक सरळसेवेने अथवा पदोन्नतीने, योग्य व्यक्तीच्या सक्त निवडीने अथवा पदोन्नतीने खालील व्यक्तीमधून करण्यात येईल :-**

**शैक्षणिक अर्हता** : १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वास्तूविशारद (बी.आर्च.) किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा तत्सम पदवी किंवा तत्सम.

**आणि**

२) मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेची नगर नियोजन, नगर रचना किंवा नगर व प्रादेशिक नियोजन मधील पदव्युत्तर पदवी/पदविका.

**अनुभव** : पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षे नगर नियोजनाचे कामकाज हाताळण्याचा अनुभव धारण करणा-या व्यक्ती अथवा १० वर्षे जबाबदारीच्या पदावर कामकाज हाताळण्याचा अनुभव असणारी व्यक्ती.

**किंवा**

एस-२७ रु.१,१८,५००-२,१४,१०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले "सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)", "अति. प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)", "अति. प्रमुख (अर्बन डिझाईन)" या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करत असलेली व्यक्ती.

**वय** : ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. प्राधिकरणातील कर्मचा-यास वयाची अट लागू नाही.

१२.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, **"प्रमुख, नगर रचना"** हे विभाग प्रमुखाचे पद असल्याने सदर पदावर नेमणूक करावयाचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत. 'प्रमुख, नगर रचना' हे रिक्त पद एकाकी असून सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीने भरण्याकरीता **अति.प्रमुख (अर्बन डिझाईन)** आणि **वरिष्ठ नियोजक** या संवर्गातील खालील अधिका-यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला :-

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | जन्म दिनांक | शैक्षणिक अर्हता | नियुक्तीचे/पदोन्नतीचे पद व दिनांक आणि त्या पदावरील एकूण अनुभव | गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.पी.एम.यादव<br>अति. प्रमुख<br>(अर्बन डिझाईन) | १६-०८-१९६८ | B.Arch.<br>(१९९२)<br><br>Post Graduate Diploma in Urban Design<br>(१९९८)<br><br>Passed Associateship Examination of Institute of Town Planner<br>(२००१) | **कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ** – दिनांक ०८-०८-१९९४ ते १७-१२-१९९८<br>**(४ वर्ष ४ महिने)**<br><br>**कनिष्ठ नियोजक** – दिनांक १८-१२-१९९८ ते ०५-०८-२००१<br>**(२ वर्ष ८ महिने)**<br><br>**उप नियोजक** – दिनांक ०६-०८-२००१ ते ०७-०५-२००७<br>**(५ वर्ष ९ महिने)**<br><br>**नगर रचनाकार (अर्बन डिझाईन)** दिनांक ०८-०५-२००७ ते ३१-०३-२००८<br>**(१० महिने)**<br><br>**वरिष्ठ नियोजक** दिनांक ०१-०४-२००८ ते २२-०८-२०१७<br>**(९ वर्ष ४ महिने)**<br><br>**अति. प्रमुख (अर्बन डिझाईन)** २३-०८-२०१७ ते आज पर्यंत<br>**(३ वर्ष ४ महिने)** | २०१५-१६<br>२०१६-१७<br>२०१७-१८<br>२०१८-१९<br>२०१९-२० | अ<br>अ<br>अ<br>७.००<br>७.६६ | अ | **सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करतात** |

| अनु. क्र. | अधिका-याचे नाव | जन्म दिनांक | शैक्षणिक अर्हता | नियुक्तीचे/पदोन्नतीचे पद व दिनांक आणि त्या पदावरील एकूण अनुभव | गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | श्री.एम.बी.पाटील, वरिष्ठ नियोजक | २५-०४-१९७० | B.E. (Civil) May, १९९१<br><br>M.E. (Civil) (T&CP) May, १९९४<br><br>Master of Social Work (MSW) | **कनिष्ठ नियोजक ०१-१२-१९९५ ते ३०-११-१९९८ (३ वर्ष )**<br><br>**उप नियोजक ०१-१२-१९९८ ते १५-०२-२००६ (७ वर्षे १ महिना १५ दिवस)**<br><br>**नियोजक १६-०२-२००६ ते ३१-०८-२०१० (४ वर्षे ६ महिना १५ दिवस)**<br><br>**वरिष्ठ नियोजक ०१-०९-२०१० ते आजपर्यंत (१० वर्षे ५ महिने)** | २०१५-१६<br>२०१६-१७<br>२०१७-१८<br>२०१८-१९<br>२०१९-२० | अ<br>अ<br>८.००<br>८.२०<br>-- | अ | **सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करतात** |
| ३ | श्री.एम.डी.माने वरिष्ठ नियोजक | ०१-०६-१९६७ | B.E. (Civil)<br><br>Diploma in Business Management<br><br>M.E. (Civil) T&CP<br>**(May, १९९९)** | **कनिष्ठ नियोजक ०१-०१-१९९२ ते १०-०७-२००१ (९ वर्षे ६ महिने)**<br><br>**उप नियोजक ११-०७-२००१ ते ०२-०३-२००८ (५ वर्षे ८ महिने)**<br><br>**नियोजक ०३-०३-२००८ ते १९-०९-२०१० (२ वर्षे ६ महिने)**<br><br>**वरिष्ठ नियोजक २०-०९-२०१० ते आजपर्यंत (१० वर्षे ५ महिने)** | २०१५-१६<br>२०१६-१७<br>२०१७-१८<br>२०१८-१९<br>२०१९-२० | अ<br>अ<br>अ<br>८.६<br>-- | अ | **सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करतात** |

१२.३ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, **"प्रमुख, नगर रचना"** हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता अति. महानगर आयुक्त (२) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठीत करण्यात आली :-

| अनु. क्र. | विभागीय पदोन्नती समितीचे सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त महानगर आयुक्त (२) | अध्यक्ष |
| २ | सह महानगर आयुक्त | सदस्य |
| ३ | वित्तीय सल्लागार | सदस्य |
| ४ | श्री. पी. जे. भांगरे, अधिक्षक अभियंता | मागासवर्गीय प्रतिनिधी |

१२.४ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, श्री.पी.एम. यादव, अति. प्रमुख (अर्बन डिझाईन) हे **"प्रमुख, नगर रचना"** या पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व नगर नियोजनाचे काम हाताळण्याचा १५ वर्षापेक्षा आणि जबाबदारीच्या पदावरील १० वर्षापेक्षा जास्त अनुभव धारण करीत असून ते सेवाज्येष्ठ देखील आहेत तसेच केवळ त्यांच्याकडेच नगर रचना (Urban Design) मधील शैक्षणिक अर्हता आहे. विभागीय पदोन्नती समितीने श्री.पी.एम. यादव यांची **"प्रमुख, नगर रचना"** या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्याकरीता एकमताने शिफारस केली. तरी उपरोक्त प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

१२.५ श्री. जयंतकुमार बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, प्रमुख, नगर रचना हया पदाकरीता विचारक्षेत्रात किती अधिकारी होते. श्री.यादव यांच्यासह अर्बन डिझाईन ह्या क्षेत्रातील अर्हता धारण करणारे इतर अधिकारी प्राधिकरणात आहेत का याबाबत माहिती देण्याबाबत सांगीतले.

महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, **प्रमुख, नगर रचना** या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार अति. प्रमुख, अर्बन डिझाईन आणि वरिष्ठ नियोजक या सवंर्गातील ३ अधिकारी आवश्यक असलेला अनुभव धारण करीत होते. श्री. यादव हे केवळ अर्बन डिझाईन ही शैक्षणिक अर्हता धारण करतात व सदर पदाकरीता आवश्यक असलेला अनुभव धारण करतात तसेच त्यांच्याशिवाय विचारक्षेत्रातील अन्य अधिकारी यांच्याकडे नगर रचना (Urban Design) मधील पदव्युत्तर पदवी नाही.

१२.६ उपरोक्तनुसार खालील प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे :-

१) प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मंजूर असलेल्या **"प्रमुख, नगर नियोजन-२" या पदाचे पदनाम "प्रमुख, नगर रचना"** असे बदलण्यास मान्यता असावी.

२) **"प्रमुख, नगर नियोजन -२"** या पदाचे **परिच्छेद १२.१** मध्ये नमूद केलेले सेवाप्रवेश नियम **"प्रमुख, नगर रचना"** या पदाकरीता ठेवण्यास मान्यता असावी.

३) **"प्रमुख, नगर नियोजन -२"** हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता **परिच्छेद - १२.३** मध्ये गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीस मान्यता असावी.

४) **"प्रमुख, नगर रचना"** या पदावर श्री.पी.एम.यादव यांची पदोन्नतीने नेमणूक करण्यास मान्यता असावी.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४१५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती बाब टिप्पणीमध्ये उल्लेख केलेल्या प्रस्तावानुसार, **"प्रमुख, नगर नियोजन-२"** या पदाचे पदनाम **"प्रमुख, नगर रचना" असे करण्यास तसेच परिच्छेद -१२.१** मध्ये नमूद केलेले **"प्रमुख, नगर नियोजन-२"** या पदाचे सेवाप्रवेश नियम जसेच्या तसे **"प्रमुख, नगर रचना"** (Chief, Urban Design) या पदास ठेवण्यास आणि श्री. पी. एम. यादव, अति. प्रमुख (अर्बन डिझाईन) यांची शैक्षणिक अर्हता व नगर नियोजनाचे काम हाताळण्याचा १५ वर्षापेक्षा आणि जबाबदारीच्या पदावरील १० वर्षापेक्षा जास्त अनुभव ग्राहय धरुन त्यांची **"प्रमुख, नगर रचना"** या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे. सदर पदोन्नतीकरीता **परिच्छेद-१२.३** मध्ये गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीस याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करण्यात आलेला विषय**

श्री.जयंत बाँठीया, सदस्य, कार्यकारी समिती व श्री.भुषण गगराणी, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी शासन आदेशान्वये प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलात उभारलेल्या कोव्हिड-१९ (टप्पा-१ व २) रुग्णालयाबाबत प्रशंसा करताना असे नमूद केले की, प्राधिकरणाने सदर रुग्णालयांचे प्रकल्प विक्रमी वेळेत उभे केले असून, रुग्णालयाचे काम उत्कृष्टरित्या केले व त्यामध्ये सर्व सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. वास्तविक रुग्णालय उभारणीचा कोणताही अनुभव प्राधिकरणाकडे नसताना तसेच संपूर्ण भारतभर लॉकडाऊन जाहिर केला असतांना व श्रमिकांचे स्वग्रही परतणारे लोंढे अशी प्रतिकुल परिस्थिती असून देखील केवळ अल्पशा कर्मचारी व अधिकारी, ३५० श्रमिकांच्या मदतीने प्राधिकरणाने श्री.आर.ए.राजीव, महानगर आयुक्त व त्यांच्या नेतृत्वाखालील

पथकाने दिवस-रात्र काम करुन सदरचा प्रकल्प विक्रमी वेळेत पूर्ण केला. त्याबद्दल मी श्री.आर.ए.राजीव, महानगर आयुक्त व प्राधिकरणाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे अभिनंदन करतो. तसेच श्री.आय.एस.चहल, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी श्री.आर.ए.राजीव, महानगर आयुक्त, प्राधिकरण व त्यांच्या अधिपत्याखाली अधिकारी/कर्मचारी यांचे व सिडको, म्हाडा, एमएमआरसीएल यांनीही अत्यंत कठीण प्रसंगात केलेल्या सहकार्याबद्दल अभिनंदन केले व असेच सहकार्य लाभावे याबाबत इच्छा प्रगट केली.

आताही शासन आदेशान्वये प्राधिकरणातर्फे मौजे वळणई, मालाड (प.), मुंबई येथे उभारण्यात येत असलेल्या २२०० बेडसचे अत्यंत मोठ्या प्रमाणावरील रुग्णालय ज्यामध्ये ७०% ऑक्सीजन बेडस् व २०० अतिदक्षता बेडस् यांचा समावेश असून याबाबत कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांनी श्री.आर.ए.राजीव, महानगर आयुक्त व त्यांच्या नेतृत्वाखालील अधिकारी/कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे संबांधित केले की, कोव्हिड रुग्णालयाचे बांधकाम हे अत्यंत जिकरीचा प्रकल्प असूनही प्राधिकरण, सिडको, एमएमआरसीएल, म्हाडा या संस्थांनी त्यांच्याकडे रुग्णालयाबाबत कोणताही अनुभव नसताना व या क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांनाही अनुभव नसताना या कार्यालयाने अत्यंत उत्कृष्टरित्या रुग्णालय उभारणीचे काम केले आहे. या अत्यंत कठीण कालावधीत उत्कृष्टरित्या व सौहार्दपूर्वक जबाबदारी पार पाडल्याबद्दल त्यांनी सर्वांना धन्यवाद दिले.

त्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १४१६ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने शासन निर्णयान्वये वांद्रे-कुर्ला संकुलात उभारलेल्या कोव्हिड-१९ रुग्णालय (टप्पा-१ व २) करीता श्री.आर.ए.राजीव, महानगर आयुक्त तसेच त्यांच्या नेतृत्वाखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी भारतामध्ये संपूर्ण लॉकडाऊन परिस्थिती असताना सदरचा प्रकल्प विक्रमी वेळेत पूर्ण केला. सदर केलेल्या कामाचा कार्यकारी समिती गौरवपूर्ण उल्लेख करुन अभिनंदन करीत आहे.”

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******